# श्रीमद्भगवद्गीता

मराठी पद्यात्मक रूपान्तर - राजेश वैध

# "श्री मद्‌भगवद्‌गीता"

(मराठी पद्यात्मक रूपांतर - राजेश वैद्य)

# "श्री गणेशवंदना"

विघ्नहर्ता-धैर्यदाता
वरददायक गणपती।
देतसे भव-तास अपुल्या
मार्गदर्शी सद्‌मती।।१।।

शब्दब्रम्हचि प्रकटले
तवरुप धारुन ईश्वरा।
सकल भूता दान दे रे
बुद्धि मंगल शुभकरा।।२।।

# "श्री सद्‌गुरूवंदना"

ज्ञान वा अधिकार नाही
नाही वाङ्‌मय कुशलता।
भक्ति नाही शुद्ध किंवा
नाही चित्ता स्थैर्यता।।१।।

एक पण आधार मजला
पार करण्या सागरा।
सद्‌गुरूची प्रेमदृष्टी
लाभली ह्या किंकरा।।२।।

यज्ञ हा संपन्न झाला
मात्र इच्छे ज्याचिया।
प्रेममूर्ति गुरू कृपाळू
परम पावन ज्ञानिया।।३।।

योग चारही करिती आश्रय
शांति लाभे मन्मना।
वंदितो तुज भक्ति भावे
गुरूवरा, नारायणआ।।४।।

## ।।श्री व्यासवंदना।।

प्रकट झाले ज्ञान सगुणि
व्यासरुपे भारति।
दिव्य ग्रंथे उजळले जग
नष्ट केलि दर्मति।।१।।

तत्ववेत्ता, ज्ञानसागर
व्यासमुनि अतिथोर हा।
ज्ञानयज्ञे पूजिला मी
ब्रम्हवेत्ता ऋषिमहा।।२।।

# ।।गीता ध्यान।।

कथन केली स्व-मुखे
नारायणे जी भारता।
दिव्य माता ज्ञानदात्री
नित्य ती भगवद्गीता।।१।।

वर्षिते अद्वैत अमृत
मोक्षदायक सफलता।
वंदितो मी माऊली ह्या
नष्ट कर मम अज्ञता।।२।।

## ।।समर्पण।।

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम्।
मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम्।।

(अध्याय ११ व अध्याय ९ - श्लोक क्र. १६)

*.....श्री नारायणाला सविनम्र समर्पण.....*

# ।।अर्जुनविषाद योग।।

धृतराष्ट्र म्हणाला :

१. धर्मक्षेत्री कुरूक्षेत्री
संगठीत युद्धोत्सुका।
माझिया अन पांडवांनि
काय केले संजया?।।१।।

संजय म्हणाला :

२. तेथ दुर्योधन प्रतापी
द्रोणसन्मुख जाहला
पाहुनि दल पांडवांचे
वचन ऐसे बोलला।।२।।

३. थोर सेना पांडवांची
संगरी जमली रणी।
द्रुपदपुत्रे योजिलेली
शिष्य तव रणकर्मणी।।३।।

४. असती येथे वीर योद्धे
पांडवांसम विक्रमी।
महारथी युयुधान-विराट
द्रुपदही रणसंयमी।।४।।

५. धृष्टकेतु-चेकितान
काशीराजा वीर्यवान।
शैब्यराजा पुरूजीता।
कुंतिभोजाही महान।।५।।

६. निर्भयी युधमन्यु पाही
उत्तमौजा शक्तिमान।
सुभद्रेचे-द्रौपदीचे
सर्व पुत्र अतिधैर्यवान।।६।।

७. सांगतो मी वीरश्रेष्ठा
ऐक अपुले वर्तमान।
कोण असती वीरयोद्धे
कोमते नेते महान।।७।।

८. द्रोण-भीष्मापिक अलौकिक
कर्ण-कृप रण भास्कर।
द्रोणपुत्र आणि विकर्ण
सौमदत्ति दुष्कर ।।८।।

९. अन्य सारे सज्ज झाले
संगरी झुंजावया।
प्राणही त्यजतिल सत्वर
माझिया श्रीःकांक्षया।।९।।

१०. सैन्य भीष्मे रक्षिलेले
त्या कुणाची जोड ना।
सैन्य भीमे रक्षिलेले
काय त्याची पाड ना।।१०।।

११. तुम्ही सर्व प्रमुखांनो ऐका
आपुल्या सैन्यासमते।
रक्षिण्या भीष्मोत्तमाला
तनमनाने व्हा सचेत।।११।।

१२. हर्षिण्या दुर्योधनाला
वृद्धकुरू सरसाविला।
सिहंनादे गर्जुनि मग
शंख त्याने फुंकिला।।१२।।

१३. शंख भेरी दुंदुर्मींनी
नभ हे सारे भारले।
त्या भयानक नाद शब्दे
युद्ध रण अंधारले।।१३।।

१४. किरीटी अर्जुन, माधवाने
युद्ध ते स्वीकारले।
शुभ्र अश्वांकृत रथातून
शंख त्यांनी फुंकिले।।१४।।

१५. पांचजन्य ऋषीकेशीचा अन,
अर्जुनाचा देवदत्त।
शत्रूधीरा, विकल कर्ता
पौंड्र फुंके भीम मत्त।।१५।।

१६ अनंतविजया ज्येष्ठ पांडव
ऐक तू महीपालका।
नकुल फुंके सुघोषाला
पांचवा मणिपुष्पका।।१६।।

१७. काशीराजा अन शिखंडी
दृष्टदुयम्न अन सात्यकी।
महाधनुर्धर-रणधुरंधर
रिपुदला अतिघातकी।।१७।।

१८. आत्मजांनी पांडवांच्या
नाद केला संगरी।
द्रुपद राजे घोष केला
शब्द घुमला अंबरी।।१८।।

१९. त्या भयानक नाद-शब्दे
अखिल जगता व्यापिले।
धर्तिराष्ट्रांच्या यशाचे
मनोरथ थरकापले।।१९।।

२०. युद्धबुद्धिने उभ्या त्या
कौरवांना पाहुनि।
कुंतीसुत हनुमत्-ध्वजांकृत
बोलला सरसावूनि।।२०।।

२१. माधवासी काय वदला
पार्थ त्याचे हृद्‌गत।

अर्जुन म्हणाला :

दोन सैन्यांच्या मधे चल
सारथि हे अच्युत।।२१।।

२२. कोण आहे युद्धप्रेमी
साहसे लढण्या रणी।
पाहण्यासी इच्छितो मी
कोण हे सेनाग्रणि।।२२।।

२३. दुष्टबुद्धि कौरवांचे
स्नेही मजला पाहू दे।
कोण ते-बल काय त्यांचे?
हे मला अजमावू दे।।२३।।

२४. ऐकूनि हे बोल त्याचे
कृषण स्व-मनी धरूला।
शत्रूदमनक अर्जुनाचा
रथ विभागे स्थापिला।।२४।।

२५. भीष्म-द्रोणादिक नरोत्तम
शस्त्र हाती घेउनि।
कृष्ण बोले"अर्जुना",
घे कौरवांसी पाहुनि।।२५।।

२६. त्या ठिकाणी पांडवाने
उभय सैन्या पाहिले।
पितृजन आणि महात्मे
पुरत्रपौभही आपुले।।२६।।

२७. सोयरे संबंधि सारे
बंधुजन आणि सखे।
खिन्न झाला पार्थ हृदयी
बोलला अपुल्या मुखे।।२७।।

अर्जुन म्हणाला :

२८. पाहुनि ह्या बांधवांना
चालता नाशाकडे।
अवयवांचे भान सुटले
मुखही पडले कोरडे।।२८।।

२९. अंग सारे थरथरे
अन रोमकंपित जाहले।
भाग गेले गांडिवाये
मन भयाने व्यापिले।।२९।।

३०. त्राण नच पायांत माझ्या
चित्त मानसी वादळे।
वाढलेली स्पष्ट दिसती
अपशकुनांची फळे।।३०।।

३१. बांधवांना मारूनि ह्या
काय होईल चांगले!
राज्यभोगाच्या यशाचे
स्वप्न माझे भंगले।।३१।।

३२. राज्य आणिक वैभवाचा
मोह नच मधुसुदना।
आप्त ऐशा ह्या जनांवर
येई मज रणक्रोध ना।।३२।।

३३. भोग आणिक महीधनाचे
ज्या करावे मुक्तदान।
त्याच माझ्या बांधवांना
कैसे घालु कंठस्थान?।।३३।।

३४. गुरू-महात्मे-स्वजन बंधु
प्रपिता-प्रपितामह।
पुत्रपौत्र-मातुल श्वशुरे
आप्त हे मित्रांसह।।३४।।

३५. सर्व माझा घात करिती
दोष तरीही ना तया।
राज्य महीचे-त्रिभुवनाचे
क्षुद्र भासे निश्चया।।३५।।

३६. धार्तराष्ट्रांनी बघुनि
काय होईल चांगले
आततायी ते जरीही
पाप होईल आपुले।।३६।।

३७. हेच अपुले मित्रजन अन
हेच अपुले बांधव।
हाती माझ्या वध्य नसवि
ऐकिसी हे केशव।।३७।।

३८. लोभी ते दुर्बुद्धि असती
मित्रद्रोही पातकी।
सर्वनाशा मूळ होई
वृत्ती त्यांची घातकी।।३८।।

३९. हे जनार्दन-श्याम-माधव
विघ्नहर्त्या सांग ना।
जाणिला परिणाम तरीही
का करू रणकंदना।।३९।।

४०. कुलक्षयाने नष्ट होई
धर्ममंगल चांगले।
दुराचारे रान माने
हिच हिंसेची फळे।।४०।।

४१. कुलिन होती मार्गी विचलित
हा अधर्माचा प्रभाव।
घोर ह्या उत्पाति ऐशा
शुद्धतेची काय ठाव?।।४१।।

४२. वर्णसंकर अतिभयंकर
घोर नरकाचे हे द्वार।
लुप्त होती पिंडदाने
लुप्त हो मतीसद्विचार।।४२।।

४३. दैन्यवाणि होत जाती
पारिवारीक धर्मकृत्ये
वर्णसंकर पार बुडवे
सद्विचारादिक सत्ये।।४३।।

४४. नरक शाश्वत प्राप्त होई
पापकर्मी त्या जनां।
हेच मी ऐकित आलो,
केशवा मधुसूदना।।४४।।

४५. क्षुद्र राज्याकामनार्थि
उतरलो रणकंदना।
पापराशी-जगविनाशी
अजमतीसी दिसत ना।।४५।।

४६. धार्तराष्ट्रांनी जरी मग
ठार केले सत्वरी
युद्ध मी करणार नाही
शस्त्र ना हाती धरी।।४६।।

संजय म्हणाला :

४७. शोक संमूढ अर्जुनाने
शस्त्र खाली ठेवले।
भ्रमित वृत्तीने बसे,
हे भर रणाने पाहिले।।४७।।

**"श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, "अर्जुनविषाद योग" नामक पहिला अध्याय समाप्त झाला।**

## ।।अध्याय क्रमांक २।।

## ।। सांख्ययोग ।।

संजय म्हणाला :

१. नेत्र ज्याचे भरूनी आले,
शब्द ज्याचे कुंठले।
करूण हृदयी अर्जुनाला,
श्रीहरी मग बोलले।।१।।

श्री भगवान म्हणाले :

२. ऐतिहासिक ह्या प्रसंगी,
काय अनुचित बोलणे।
हीन दुर्बल किर्ती भंजित
योग्य नाही वागणे।।२।।

३. त्यजुनी दे नामर्द वृत्ती
त्याग दुर्बल भावना।
उठ चल-घे शस्त्र हाती,
शत्रूभंजक अर्जुना।।३।।

अर्जुन म्हणाला :

४. भीष्म-द्रोणांसम महात्मे,
पात्र पूजा वंदना।
त्यांवरी मी शस्त्र फेकू.....?
पाप ते मधुसुदना।।४।।

५. ह्या गुरूंना ठार मारून,
रक्त लंछित सुख मिळे।
का न व्हाने मग भिकारी,
हेच मजला नां कळे।।५।।

६. त्याहीपेक्षा काय सांगू,
संकटी मती व्याकुळे।
कोणी कोणांसी वधावे,
बंधु सारे आपुले।।६।।

७. बुद्धिदोषाच्या प्रभावे
नष्टले मम साहस।
सांग कृष्णा मार्ग निश्चित
काय आता श्रेयस।।७।।

८. राज्य निःष्कंटक मिळालें,
देवतांचेही जरी।
इंद्रियांना जाळणारा,
शोक ना मज आवरी।।८।।

संजय म्हणाला :

९. शब्द दुःखित हे वदुनी
पार्थ स्तंभित जाहला।
नाही लढणे ह्या प्रसंगी,
म्हणूनी कृष्णा बोलला।।९।।

१०. ऐक तू धृतराष्ट्र राजा
काय ते झाले पुढे।
हास्य करूनी कृष्ण बोले,
दोन सैन्यांच्या मधे।।१०।।

श्री भगवान म्हणाले :

११. व्यर्थ पार्था शोक करिसी
व्यर्थ पंडिती भाषणा।
कोण जगले कोण गेले
ज्ञानियांना दुःख ना।।११।।

१२. मी स्वतः अन तुही पार्था
भूपती समुपस्थित
काल होते, आज असती
अन भविष्यी शाश्वत।।१२।।

१३. देह आश्रित जीव भोगे,
बाल्य-यौवन-वृद्धता
देह सांडे-देह लाभे
ज्ञान असते पंडिता।।१३।।

१४. वस्तु आणिक इंद्रियांच्या
स्पर्शयोगे जन्मती।
दुःखसुख, शीतोष्ण वृत्ती,
सोस त्यांना दृढमती।।१४।।

१५. अमर होई तोच मानव
जाण पार्था अर्जुना।
सौख्य आणिक वेदनांनते
जो करितो भेदना।।१५।।

१६. नित्य नसते "नाही-जे"
पण सत्य असते शाश्वत।
ज्ञान हे परिपूर्ण पार्था
जाणती जन पंडित।।१६।।

१७. विश्व ज्याने व्यापिलेले,
तोची आत्मा अ-क्षर।
नष्ट त्याला कोण करितो?
तो अजन्मा अ-क्षय।।१७।।

१८. ही शरीरे नष्ट होती
अंत नाही अ-क्षरा।
म्हणूनी पार्था, उचल शस्त्रा
घे उडी रणसंगरा।।१८।।

१९. अज्ञ म्हणती "मारी आत्मा"
'आत्मयासी मारीला'।
तो न मारे त्यासी पार्था
ना कुणी निर्दाळीला।।१९।।

२०. जन्म-मृत्यु येरझाऱ्या
ह्या शरिरे बद्धता।
अतीपुराणी अचल आत्मा
तो अजन्मा शाश्वता।।२०।।

२१. जाणितो जो अ-क्षराला
अचल शाश्वत अव्यया।
ज्ञानी ना मारे कुणाला
जाई ना बघ तो लया।।२१।।

२२. जीर्ण गृह वा जीर्ण वसना,
त्यागती नव कांक्षइता।
देह नूतन जीव धारे
जीर्ण देहा त्यागिता।।२२।।

२३. शस्त्र नच त्या छेदिती
ना अग्नी त्यासी जाळितो
आप भिजवे नाही त्या, ना
पवन आत्म्या शोभितो।।२३।।

२४. जाळू शकती ना कुणी
ना होई त्याचे छेदन
नित्य अचल तो सर्वव्यापी
नच भिजे नच शोषण।।२४।।

२५. व्यक्त नाही तो स्वरूपी
तो अचिंत्या अव्यया।
जाण तू हे गूढ पार्थाॲ
ज्ञानधन करी संचया।।२५।।

२६. गृहीत घरले जरीही आत्मा
भ्रमितो मृत्यु जीवनी
तरीही पार्था, शोक करणे,
जाई निष्फल कारणी।।२६।।

२७. जन्मलेल्या मृत्यु निश्चित
मृत्युनंतर सृजनता।
जाण पार्था मार्ग निश्चय,
शोक करणे व्यर्थना।।२७।।

२८. आदि आणिक अंतःकाली
व्यक्त नसती जीवजडे।
मध्यकाली प्रकट होता।
मोह का चित्ता पडे?।।२८।।

२९. कोणी पाही चकीत होऊनी,
कोणी बोले अद्‌भुता।
कोणी ऐके थक्क होऊनी
नाकळे परी गुह्यता।।२९।।

३०. वध्य नाही ऐक पार्था,
देह आश्रित तत्व ते।
शोक करणे योग्य नाही
त्या अजन्मा शाश्वते।।३०।।

३१. जाण पार्था, तू स्वधर्मा
का विकम्पित हो गती,
क्षात्र जन्मी नच मिळे बघ
धर्मयुद्‌धा सम गती।।३१।।

३२. क्षत्रियासी युद्‌ध ऐसे
थोर सुकृत पर्वणी।
द्वार स्वर्गाचे उघडले,
मानिती वीराग्रणी।।३२।।

३३. धर्मयुद्धा ना म्हणूनी
करीसी तू पापाश्रया।
धर्म त्यजुनी का करीसी
हीन तो किर्तीक्षया।।३३।।

३४. ही अकिर्ती जाण पार्था,
सांगती जन हांसुनी।
किर्तीमंडिल महानुभावां
श्लाध्य ती मरणांहुनी।।३४।।

३५. युद्धभिता-युद्धत्यक्त्वा
जाणीती तुज वीर हे।
नष्ट होईल मान पार्था,
ताडिती तुज दुःसहे।।३५।।

३६. निदतील मग वीरशत्रू
तुजप्रति धःक्कारूनी।
दुःख त्यासम कोणते तू
भोगिसी ह्या जीवनी?।।३६।।

३७. मरून भोगी स्वर्ग, किंवा
विजय अंती महीपती।
उठ कौंतेया करूनी
युद्धकर्मी दृढमती।।३७।।

३८. मानुनी सम सुखदुःख।
लाभहानी जयजया।
युद्ध ह्यांसम केले त्वांजर
करीसी ना पापाश्रया।।३८।।

३९. ऐक पार्था, बुद्धिमार्गा
सांख्ययोगाची मती।
कर्मबंधे मुक्त होशील,
पाविसी उत्तम गती।।३९।।

४०. सांख्यमार्गाच्या प्रयत्ने
येत कसला दोष ना।
अल्पयत्ने ह्या विचारे
ना उरे महाभय मना।।४०।।

४२. काम्यभोगांच्या भिलाषे
वदति पुष्पित वैखरी।
मूढदांभिक वदति वेदिक
कर्मकांडांच्या परी।।४२।।

४३. कामतृप्ती-स्वर्गप्राप्ती....
....जीवनाची फलश्रुती।
मानूनी मग वर्तती ते
पाविती तत्सम गती।।४३।।

४४. काम-भोगा-धन-प्रलोभा
बद्धती जे जीवनी।
बुद्‌धि त्यांची भ्रष्ट होई,
नच मिळे शांती मनी।।४४।।

४५. सांगती त्रैगुण्य महती
वेदवाक्ये अर्जुना।
स्वस्थचित्ती द्वंद्व आतित
जा करूनी त्रीगुणा।।४५।।

४६. पृथ्वी होता पूर्ण जलमय
काय कामाचे कूपं?
ब्रम्हज्ञात्या ब्राम्हणाला,
वेद त्यासम निर् उपं।।४६।।

४७. कर्म करण्याचा तू स्वामा,
फलप्रती अधिकार ना।
कर्म ना करी फलविचारे,
कर्मवृत्ती नच त्याग ना।।४७।।

४८. ती स्थिती योगस्थ पार्था,
हो समत्वी तव मती।
सिद्धसिद्धि लाभ हानी
योगदृष्टे सम गती।।४८।।

४९. मती समत्वी-कर्मकृत्यें
जाण तू अतीश्रेष्ठतम्।
बोगप्रेरीत कर्म-कर्ते
वासनें होती अधम्।४९।।

५०. ठेव पार्था मती समत्वी
मुक्त सुकृत-दुष्कृती।
योगभावे करिसी कर्मे
पाव परिपूर्णस्थिती।।५०।।

५१. योगयुक्ते-बुद्धियुक्ते
त्यजुनि कांक्षित भावना।
जन्मबंधी हो विमुक्ते
पाविती पद ब्राम्हणा।।५१।।

५२. बुद्धि जेव्हा पार होई
मोहविद्ये बंधनी।
वादवादे हो निरिच्छित
ना उरे शंका मनी।।५२।।

५३. बुद्धि नाना मत विचारे
भ्रांतते-भय-कंपते।
स्थिर होता ती समत्वी
योगप्राप्ती सिद्धते।।५३।।

अर्जुन म्हणाला :

५४. स्थितप्रज्ञा, स्थिरस्वभावा,
जाणू कैसे केशवा।
बोले वागे आणि चाले
काय लीले माधवा।।५४।।

श्री भगवान म्हणाले :

५५. त्यागे पार्था जो महात्मा
कामसंकल्प भावना।
आत्मरती जो आत्मज्ञानी,
स्थिरबुद्धि, अर्जुना।।५५।।

५६. दुःखदोषे नच विकम्पित
सुखप्रसंगी स्थैर्यता।
राग-क्रोधे-भय-विमुक्ते
थोर ते मुनी धीमता।।५६।।

५७. दुःख नाही - सुख नाही
ना शुभाशुभ भावना
स्नेह ना- अस्नेह ना
तो स्थितप्रज्ञा, अर्जुना।।५७।।

५८. कूर्म ज्यासम इंद्रियांना
सावरे इच्छाबळे।
त्यजति पार्था विषय भोगां,
बुद्धि त्यांची ना ढळे।।५८।।

५९. विषय-लोभा प्रती न मोहा
उरतसे त्वां इंद्रियां।
ब्रम्हज्ञाना जाणूनी मग
वर्जती ते रसप्रिरणा।।५९।।

६०. कुंतीपुत्रा जाण लीला
इंद्रियांची बलसचेत।
ज्ञानियांचे मनही नेत्री
ओढूनी अपुल्यासमेत।।६०।।

६१. योगी निश्चित करी नियंत्रित
विषय-इन्द्रिय-वासना।
जाणूनी मम परम धामा
शुद्‌ध बुद्‌धि भावना।।६१।।

६२. सतत करीता विषय चिंतन
बद्‌ध हो मन त्यासवे।
बंधनाते काम येई
क्रोध त्यातून संभवे।।६२।।

६३. मोह जन्मे क्रोध गर्भे
त्यातूनि भ्रमते स्मृती।
नष्टते बुद्‌धि, बिभित्सो
ती भयंकर, दुर्गति।।६३।।

६४. योगी धीःमती बुद्धियुक्ते,
रागद्वेषा पारखे।
इन्द्रियांना वश करूनी,
पाविती शांतीसुखे।।६४।।

६५. शांतीयोगे जाण पार्था
दुःख सारी नष्टती।
स्थिर बुद्धि समविचारी
शुद्ध चित्ती सद्‌मती।।६५।।

६६. चित्त ज्यांचे चपल दुर्बल,
ना तशा दृढ भावना।
ना मिळे शांती तयांना,
नच मिळे सुख त्याजनां।।६९।।

६७. नाव ज्यासम कलते-भ्रमते
वायुने पाण्यावरी
इन्द्रिय अर्पित तैसे मानस,
विमुख हो ज्ञानापरी।।६७।।

६८. म्हणनू पार्था योगियांची
बुद्धि नच विषयी चळे।
इन्द्रियांवरी पूर्ण सत्ता
स्थैर्य-शांती ना ढळे।।६८।।

६९. भासे जगप्रत दिवस जो
ती रात्र समजे संयमी।
रात्र वाटे जी जनांना,
दिवस तो जाणे मुनी।।६९।।

७०. वेगवाही नदी प्रवाही
सागरी होते स्थिता।
शांतीपद पावे सुखाने,
कामवर्जित धीःमता।।७०।।

७१. परम शांती पावतो
जो त्यागे "मी" पण भावना।
हो विमुक्ता सांडितो जो
काम-इच्छा-वासना।।७१।।

७२. ही स्थिती ब्राम्ही सुखाची
स्थिर प्रज्ञा सर्वदा।
मृत्युसमयी हीच स्थिती-
ते पाविती ब्रम्हःपदा।।७२।।

**।। श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योग्यशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांच्या संवाद आहे, "सांख्ययोग" नामक दुसरा अध्याय समाप्त झाला ।।**

## ।। कर्मयोग ।।

अर्जुन म्हणाला :

१. देई जर ज्ञाना महत्वे
कर्म करण्याचेवरी।
युद्धकृत्या का भयंकर
पाडिसी मजला भरी।।१।।

२. शब्दजाले, मिश्रवाक्ये,
होई कुंठीत मन्मती।
सांग निश्चित मार्ग हितकर
देई जो उत्तम गती।।२।।

श्री भगवान म्हणाले :

३. दिधले पार्था, दोन मार्गा,
माच आदिजीवनी।
ज्ञानप्रवणां ज्ञानयोगा,
कर्मयोगा सज्जनी।।३।।

४. कर्म सोडूनी मानवाते
निःष्कर्मका प्राप्तना।
त्यागुनी संसार सारा
भाव संज्ञस्त येत ना।।४।।

५. ना कुणी क्षणभरही राही,
कर्म केल्यावाचुनी।
प्रकृतीचे गुण बलान्वीत
देती कर्मे लादुनी।।५।।

६. मूढ माणुस जाण पार्था
मित्थ्य वर्तन आचरे।
सावरे जो इंद्रियांसी
मन विकारें संचरे।।६।।

७. मनउपाये जो महात्मा
इंद्रियांसी आवरे।
श्रेष्ठभावा प्राप्त होई,
योगकर्म जो आचरे।।७।।

८. शास्त्रसंमंत विहित कर्मे
थोर अ-कर्मांपरी।
देहयात्रा कशी चलावी,
कर्म ती त्यजल्यावरी।।८।।

९. यज्ञभावें कर्म अर्पित
देती जीवा बंध ना।
मुक्तसंगे, यज्ञकर्मे
करीती तुजला बद्ध ना।।९।।

१०. सृष्टी आणिक यज्ञकर्मे
प्रसविली ब्रम्हाप्रते।
यज्ञ जाणा कामधेनू,
होई मंगल निश्चिते।।१०।।

११. देव देती वृद्धी मनुजे
वृद्धी द्यावी देवतां।
यज्ञकर्मे मिळती दोघा
मोक्षप्रद संपन्नता।।११।।

...३...

१२. तुष्ट होऊनी यज्ञकर्मी
देव देती इष्टकाम।
भोग घेऊनी जे न अर्पि
देवहवि ते चौर्यकाम।।१२।।

१३. अन्न अर्पूनि यज्ञकर्मी
सन्त भक्षति शुच प्रसाद
अर्पिती ना अन्न यज्ञी
करिती निश्चित ते प्रमाद।।१३।।

१४. अन्न.क्ररी उत्पन्न भूता
अन्न ये वृष्टीतूनी।
यज्ञ कारण पावसाचे,
यज्ञ हे कर्मातूनी।।१४।।

१५. वेद देती कर्मकृत्ये,
वेद स्फुरली अ-क्षरे
नित्य यज्ञाप्रत अधिष्ठित
ब्रम्ह सर्वत्रसंचरे।।१५।।

१६. चक्र सृष्टीचे असे हे
जाणती ना जी जने।
वागती ना शास्त्रसंमत
पाप करिती जीवने।।१६।।

१७. आत्मरती जो आत्मतुष्टी
आत्मसंपन्न सु-स्थिरे।
शेष नसती कर्म ना
कर्तव्य त्या काही उरे।।१७।।

१८. कर्म केले वा न केले
हानी ना सुख-दुःख ना।
थोर ऐशा मानवाला
मोह ना, कर्तव्य ना।।१८।।

१९. म्हणूनी पार्था कर्म करिसी
मोहबुद्धि त्यागुनी।
पाविती जन श्रेष्ठ धामा
कर्मयोगे वागूनी।।१९।।

२०. कर्मयोगे थोर झाली
जनकराजादिक नरे।
लोकसंग्रह जाणूनिया
कर्मकर्तव्य तुज उरे।।२०।।

२१. श्रेष्ठ वागे ज्याप्रकारे,
समुह त्याला अनुसरे
श्रेष्ठ वर्तन म्हणूनी पार्था,
मानिती जन आदरे।।२१।।

२२. जाण पार्था मजसी नुरले
कर्म त्रैलोक्यभुवनी।
प्राप्य ना अप्राप्य काही
कर्मरत मी प्रतिक्षणी।।२२।।

२३. केले ना जर कर्म रूद्यम
थोर अविरत प्रतिक्षणा।
सकलजन अनुसरति मार्गा,
माझिया हे अर्जुना।।२३।।

२४. नष्ट होतील सकल भुवने
कर्म जर मी केले ना।
भ्रष्ट होतील श्रेष्ठ मूल्ये
नाश हो मत्कारणआ।।२४।।

२५. होऊनि आसक्त पार्था
अज्ञ आचरती कृती
इच्छूनि जनहित ज्ञानी
त्यजुनि मोहा वर्तति।।२५।।

२६. अज्ञजनमतीभेद पार्था
ना करावा ज्ञानिये।
स्वप्रमाणे, कर्मयोगे
ज्ञान द्यावे सुप्रिये।।२६।।

२७. प्रकृतीचे गुण बलान्वीत
करीती कर्मे प्रतीक्षणा।
अज्ञबुद्धि मदविचारे
जाणे कर्ता आपणां।।२७।।

२८. जाणितो पण तत्ववेत्ता
कर्मगुण अधिलक्षणे।
उमजुनी "स्व-पृथक" भावा,
बद्‌ध ना हो "मी-पणे"।।२८।।

२९. "मीच कर्ता" ही अहंता,
अज्ञ ना जाणे गुणां।
प्रेमभावे ज्ञान द्यावे
ज्ञानिये ऐशा जनां।।२९।।

३०. म्हणूनी पार्था, हो विरक्ता
कर्म त्यागी मत्परी।
त्यागुनी अशाभिलाषा
युद्ध कर रणसंगरी।।३०।।

३१. भक्तीभावे मज विचारे
श्रद्धजन जे वर्तति।
मुक्त होऊनि कर्मबंधे.
पावती उत्तम गति।।३१।।

३२. मूर्ख ती मतीमूढ भूते,
मानिती ना मन्मती।
अविवेके भ्रष्ट होऊनी
पाविती अति दुर्गती।।३२।।

३३. प्रकृतीचे स्वरूप जाणून
ज्ञानी वागे त्यापरी
गुणस्वभावे होई वर्तन
जोर ना चाले तरी।।३३।।

३४. भोग्य आणिक त्याज्य वस्तु
इंद्रयांसी आकळे।
लांघ मनुजा, ह्या रिपुंना,
सत्य त्याहूनी वेगळे।।३४।।

३५. ना असे जरी दोषविरहीत
दत्त दर्मनियतीकृतं।
धर्मपालनी मृत्यु सुखकर,
परधर्म अती अनुचितं।।३५।।

अर्जुन म्हणाला :

३६. सांग कृष्णा गूढ अद्‌भूत
कोणत्या लीलेमुळे
पाप करीतो मनुज हतबल
कोणत्या मायेबळे।।३६।।

श्री भगवान म्हणाले :

३७. काम आणिक क्रोध पार्था
थोर हे रजगुणविकार।
सर्वभक्षक-सर्वनाशी
जाण हा निश्चित विचार।।३७।।

३८. धूर झाके पावकाला
धूळ झाके दर्पणा।
वार वेष्टित गर्भ तैसे
झाकिती ते आत्मना।।३८।।

३९. तृप्त ना हो काम कधीही
भडकत्या अग्नीपरी।
ज्ञानियाचा नित्य वैरी,
ज्ञान वेष्टीत जोकरी।।३९।।

४०. इन्द्रयां-बुद्धि मनाते
काम करी आपुले निधान।
ज्ञान झाकुन ज्ञानियाचे
मोह त्या करीतो प्रदान।।४०।।

४२. इन्द्रयांवर विजय मिळवी,
म्हणूनी पार्था अर्जुना।
नष्ट कर हा शत्रू पापी
ज्ञान करी जो भंजना।।४१।।

४२. देह हाले इंद्रियांनी
मन बलान्वीत त्यांहूनि।
मानसाहूनि श्रेष्ठ बुद्धि
श्रेष्ठ आत्मा त्याहूनि।।४२।।

४३. श्रेष्ठ जाणूनी आत्मब्रम्हा
थोर जो बुद्धिहुनी।
नष्ट करिसी कामवैऱ्या
बुद्धि आत्म्या अर्पूनी।।४३।।

।।श्री भगवद्गीता उपनिषदातील ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, 'कर्मयोग' नामक तृतीय अध्याय समाप्त झाला"।।

# ||अध्याय क्रमांक ४||

## ||ज्ञानकर्मसंन्यास योग||

श्री भगवान म्हणाले :

१. सकल शाश्वत योग अक्षय
मी दिला सूर्या स्वये।
देई रवी तो आद्यमनुसी,
येई प्रतईश्वाकुचिये।।१।।

२. प्राप्त ऐसा योगमार्गा
जाणिला राजर्षींनी।
नष्ट होई, योग सांप्रत
शतकांचिया ओघातूनी।।२।।

३. आद्य त्या योगास पार्था,
आज मी तुजप्रत दिला।
गूढ हे अतीश्रेष्ठ जाणी
प्रिय असशी तू मला।।३।।

अर्जुन म्हणाला :

४. सूर्य जन्मे आदिकाली,
जन्मसी तू ह्या युगी।
शिकवी मग कैसे रवीसी,
बोध ना हो मजलगी।।४।।

श्री भगवान म्हणाले :

५. जन्म ते कित्येक झाले,
कुंतीपुत्रा आपुले।
ज्ञान मजला पूर्ण त्यांचे
ना तुवा विस्मृती बले।।५।।

६. मी चिरंतन परमईश्वर,
प्रकृतिचा अधीपती।
योगमायचेच्या बलाने
जन्मतो सृष्टीप्रती।।६।।

७. ग्लानी ये धर्मास जेव्हा,
हो अधर्मच शक्तीमान।
जन्म घेतो जाण पार्था,
होऊनी मी विद्यमान।।७।।

८. रक्षिण्या साधुजनांना,
ताडण्या दुष्टाधमांना।
स्थापना धर्माची करण्या,
प्रकटतो युगप्रतयुगांना।।८।।

९. दिव्य माझ्या जन्मकर्मा,
जाणितो जो ज्ञानिया।
देह त्यजता, येईमजप्रती,
मुक्त हो जन्मांचिया।।९।।

१०. काम-क्रोध आणि भयातून
मुक्त होऊनी सद्‌मती।
ज्ञानतपसी ज्ञानियांनी
पाविली माझी गती।।१०।।

११. करीती चिंतन ज्या प्रभावे,
पावितो मी त्याबळे।
भजती जन मज विविध मार्गे,
देई मी तैशी फळे।।११।।

१२. सिद्धि आणिक यशभिलाषे,
भजती जन अधिदेवता।
कर्मफल हो सिद्ध सत्वर
मनुजलोकी तत्वतः।।१२।।

१३. वर्ण मी उत्पन्न केले,
जाणूनी गुणकर्मणा।
नाही, कर्ता जाण पार्था,
अचल स्थिर मी निर्गुणा।।१३।।

१४. कर्म ना मज लिंपती अन्,
ना फलाची कामना।
जाणिती जो मज यथार्थे,
मुक्त कर्मीबंधना।।१४।।

१५. पावले जरी परमधामा,
थोर ज्ञानी जन तरी।
कर्म नाही त्यागीले,
तू मार्ग त्यांचा अनुसरी।।१५।।

१६. ज्ञानीही संभ्रमित होती
कर्मकर्माच्या मती।
"कर्म कुठले" जाण निश्चित
लाधिसी अशुभ गती।।१६।।

१७. बुद्धिमार्गे पृथक जाणी,
कर्म विकर्मा पासूनी।
वेगळे अ-कर्म पार्था,
गहन अती गती कर्मणी।।१७।।

१८. कर्मकृत्यी स्थैर्य पाही
स्थैर्यभावी कार्यता।
कर्मसंपन्न योगी ऐसा
थोर त्याची योग्यता।।१८।।

१९. करीतसे जो कर्मउद्यमा,
त्यागुनि आशाफले।
दग्ध कर्मे ज्ञान अग्नी,
होती म्हणती जाणते।।१९।।

२०. त्यजुन कर्माफलभिलाषा
तृप्त कर्मांप्रतरती
बद्‌ध ना हो कर्मबंधी
मतुज ऐसा सद्‌मती।।२०।।

२१. त्यजुनी आशा-फलभिलाषा,
चित्त नियमी ठेवूनी।
मुक्त भावे कर्म करी जो
बद्‌ध ना हो बंधनी।।२१।।

२२. सहजयोगे लाभे त्यांते
मोदभावे राहूनि।
मुक्त मुत्सर द्‌वंद्‌व बुद्‌धी
पार हो पाशांतूनी।।२२।।

२३. मुक्त होऊनी मी'पणातून
चित्त ज्ञाने अर्पिले।
कर्मकरी जो यज्ञभावे
बंध त्याचे नष्टले।।२३।।

२४. यज्ञजाणे ब्रम्ह
अर्पे ब्रम्हदवि अग्नीप्रती।
अग्नीही जो ब्रम्ह जाणे
पावितो ब्रम्हाप्रती।।२४।।

२५. दैवतुष्टी प्रत समर्पित
यज्ञ करीती जन कुणी।
अन्य करीती 'मी'पणाला
ब्रम्ह अग्नी अर्पणी।।२५।।

२६. थोर संयम अग्नी चेतुन
इंद्रिये कुणी अर्पिती।
विषयवस्तु कुणी महात्मे
इंद्रियाग्नीत दग्धती।।२६।।

२७. कर्मसारी इंद्रियांची
प्राणकर्मे अन पहा।
करीती जन कुणी ज्ञानदिप्तीत
अग्नीसंयम प्रत स्वाहा।।२७।।

२८. करीती जनबप द्रव्य यज्ञा
योग कुणी जन अर्पिती।
ज्ञान यज्ञा करीती कोणी
घोर तप कुणी मांडिती।।२८।।

२९. करिती कोणी सुनियंत्रित
प्राणशक्तिच्या गती।
जाण प्राणआयम बिभत्सो
यज्ञ ऐसे निश्चिती।।२९।।

३०. अन्नभक्षण करुनी नियमन
यज्ञ आचरती कुणी।
जाण ऐशा ज्ञानियांना
यज्ञविद ह्या भुवनि।।३०।।

३१. यज्ञअर्पण करिती भक्षण
उर्वरित हविभाग जे।
पाविती ते ब्रम्हलोका
थोर जन अधिकारी ते।।३१।।

३२. वेद आणिक ब्राम्हणांनी
वर्णिलेले यज्ञ हे।
झाले निर्मित कर्मयोगे
जाण पार्था गुह्य हे।।३२।।

३३. श्रेष्ठ जाणिती ज्ञान यज्ञ्या
द्रव्य यज्ञ्याचे परी।
कर्म सारे संचिते बघ
ज्ञान प्राप्ती मंदिरी।।३३।।

३४. विनय सेवा भावनेने
ज्ञानियांसी तोषवावे।
ज्ञान अनुभव मंडितांच्या
दार्शनाने धन्य व्हावे।।३४।।

३५. जाणूनि हे गुह्य राया
होशि ना संभ्रमित तू।
पाहसी ब्रम्हांड सारे
आपुल्या दोघांत तू।।३५।।

३६. अधमपापी दिन जरी तू
असशी ह्या अवनीवरी।
जाणूनी हे ज्ञान उत्तम
पार पडिसी तू तरी।।३६।।

३७. सर्व समिधा भस्म करीतसे
प्रश्वर अग्नी ज्यापरी।
ज्ञान करीतसे भस्म कर्मे
जाण गांडिवशरधरी।।३७।।

३८. नाही तुलना नाही तुळणा
ज्ञानमहतीस भूवरी।
योग्य समयी बोध होई
योगियांसी अंतरी।।३८।।

३९. जितइंद्रिय अन समर्पित,
ज्ञानवचन ज्याचे मुखे
पावितो तो सहज पार्था
परमशांतिप्रत सुखे।।३९।।

४०. ज्ञान नाही भाव नाही
बुद्धी नाही ज्या नरे।
नाही शांती नाही सद्‌गती
लोकी वा परलोकी रे।।४०।।

४१. कर्मकरूनही जो विमुक्ता
संशयासी ताडिले।
ज्ञानयुक्ता त्या नराचे
बंध सारे नष्टले।।४१।।

४२. म्हणूनी पार्था ज्ञानशस्त्रे
छेदिसी अज्ञान तू,।
मुक्त होऊनी ज्ञानयोगे
मुक्तभावे लढसि तू।।४२।।

**।। श्री भगवद्गीता उपनिषदातील ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांच्या संवाद आहे, ज्ञानकर्मसंन्यास योग नामक चतुर्थ अध्याय समाप्त झाला।।**

# ।।अध्याय क्रमांक ५।।

## ।।संन्यास योग।।

अर्जुन म्हणाला :

१. कर्म करणे-कर्म त्यजणे
मार्ग दोन्ही वेगळे।
श्रेष्ठ दोन्ही म्हणसी कृष्णा
गुढ मज ना आकळे।।१।।

श्री भगवान म्हणाले :

२. मार्ग दोन्ही श्रेष्ठ पार्था
नेती उत्तम गती प्रती।
कर्मयोगी जाणी हितकर
ऐकिसी तू मन्मती।।२।।

३. ना जयासी द्वेष-ईर्ष्या
ना कशाची हावती।
पार केली द्वैतबुद्धी
मुक्त तो बघ धीःमती।।३।।

४. भेद पाहे अल्पबुद्धी
ज्ञानी पाहे एकता।
सांख्य आणि कर्म मार्गी।
नाही कसली भिन्नता।।४।।

५. सांख्यमार्गे गति मिळे, ती
कर्मयोगी पाविती।
पाहतो एकत्व ऐसा
थोर नर तो सद्मती।।५।।

६. कर्मयोगा जाणि सुखकर
अन्य मार्गांचे परी।
पावे सत्वर परमब्रम्हा
मार्ग हा जो अनुचरी।।६।।

७. योगयुक्ता विशुद्धात्मा
निग्रही विजीतेंद्रिया।
भावे कर्म करी जरी
मुक्त ऐसा योगिया।।७।।

८. नाही कर्ता भाव ऐसा
धरीतो पार्था योगाया।
इंद्रिये करी विविध कर्मे
जाणी आत्म्या वेगळा।।८।।

९. वस्तु आणिक इंद्रियांचा
खेळा चाले प्रत्यही
आहे त्याहून पृथक आत्मा
जाणितो तो निग्रही।।९।।

१०. ब्रम्हभावे कर्म करिसी
त्यजुनि "मी" पण भावना।
कमलपत्रापरी अलिप्ता
राहतो तो अर्जुना।।१०।।

११. बुद्धि-मानस-इंद्रियांनी
कर्म करी योगस्थिता।
आत्मशुद्धि हीच प्राप्ती
जाणि तो मोहातीता।।११।।

१८. विनय विद्या प्राप्त पंडित
पाहतो एकात्मता।
उच्च किंवा अधमवर्णी
जाणए एकच तत्वता।।१८।।

१९. कुलीन किंवा भ्रष्ट जाती
श्वान-हस्ती-गाय-ही
भिन्न रूपे दृष्य-नामे
तत्व एकच निश्चयी।।१९।।

२०. जग हे नश्वर, तरीही अ-क्षर
प्राशुनि ज्ञानामृता।
जाणूनी सम सर्वभूता
होती पंडित मद्स्थिता।।२०।।

२१. ब्रम्हस्थित ज्ञानी महात्मा
स्थिर बुद्धि दृढमती
प्रिय वा अप्रिय मिळूनि
ढळते ना त्यांची स्थिती।।२१।।

२२. बाह्य संपर्का त्यजुनि
आत्मचिंतन करीतसे
सत्चिदानंदास्वरूपी
ठेव त्याला मिळतसे।।२२।।

२३. बाह्यभौतिक सुखं जाणि
दुःखयोनि अर्जुना।
शाश्वती नाही तयांची
हे ठाऊके ज्ञानी जनां।।२३।।

२४. ह्याच जन्मी ह्याच देही
काम-क्रोध जिंकिला।
जाण त्याला योगी पार्था
मोक्ष त्याने मिळविला।।२४।।

२५. अंतरी सुखशांती ज्याची
ध्यान अंतर्साधना।
सर्य ज्ञानाचा गवसला
अंतरी त्या ब्राम्हणा।।२५।।

२६. दोष ज्यांचे नष्ट झाले
प्रश्न ज्यांचे संपले।
साधिती जनहित प्रितक्षण
मोक्षपदी ते पावले।।२६।।

२७. कामक्रोध त्यजुनि ज्यांनी
चित्त मत्प्रती अर्पिले।
सत्चिदानंदाप्रवाही
ते चिरंतन नाहले।।२७।।

२८. सेवितो एकांत, दृष्टी
दोन भुवयांचे मधी।
श्वासगतीचे करुनी नियमन
ध्यायतो अ-क्षर निधी।।२८।।

२९. इंद्रिये-मन-बुद्धि संयत
त्यजुनि इच्छा वासना।
मुक्त होई खचित नर तो
जाण पार्था, अर्जुना।।२९।।

३०. अखिल सृष्टी मी महेश्वर
भूतमात्री मी सखा।
यज्ञ तपसांचा मी भोक्ता
जाणि जो, मिळवि सुखा।।३०।।

**।।श्री भगवद्‌गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, "संन्यास योग" नामक पंचम अध्याय समाप्त झाला।।**

## ।।अध्याय क्रमांक ६।।

### ।। ध्यान योग ।।

श्री भगवान म्हणाले :

१. त्याजिली ज्याने फलपिपाशा
कर्म करी पण प्रत्यही।
योगी संन्यस्त जाण त्याला
तो महात्मा निग्रही।।१।।

२. न्यास करणे कामनांचा
करूनि संयम दृढमती।
मार्ग हा संन्यस्त राया,
समजसी तू निश्चिती।।२।।

३. कर्म सोपे-सरळ-साधन
मिळविण्या योगस्थिती।
शांत मानस-चित्त-बुद्धि
प्राप्त होई सुस्थिती।।३।।

४. जाण त्याला योगस्थित जो
त्यजतो साऱ्या वासना।
इंद्रयोद्भव काम्य कर्मे
त्यजिली ज्याने अर्जुना।।४।।

५. उद्धरावे स्वये स्वतःला
मित्र होऊनि आपुले।
घात अपुला करणे आपण
कृत्य नाही ते भले।।५।।

६. जिंकिले ज्याने स्वतःला
तो सखा अपुला स्वये।
कमक्रोधांचा जो अंकित
आत्मघाती निश्चये।।६।।

७. स्थैर्यचित्ता संयमी जो
शांत स्थिर तो सर्वदा।
लाभहानी-सुखदुःखे
शीत-उष्णी धीःमता।।७।।

८. ज्ञानविज्ञाने सुमंडित
स्थिर तो विवितेंद्रिया।
मृत्तिका-पाषाण-कनकी
भेदमती जाते लया।।८।।

९. मित्र-साधु-बंधु किंवा
शत्रु-पापी-घातकी
मध्यपक्षी वा उदासीन
वृत्ति सर्वांसारखी।।९।।

१०. सेवूनि एकांत चित्ता
करूनि स्थिर दृढ निश्चया।
ठेवूनि निरपेक्ष बुद्धि
योगी हो विजितेंद्रिया।।१०।।

११. पुण्य आणिक शुचित देशी
करूनि स्थिर निज आसना।
योग्य उंचीवर करोनि
शुद्ध आसन स्थापना।।११।।

१२. करूनि मन एकाग्र संयत
इंद्रियांना सारखे।
ध्यानयोगा आचरावे
शुद्‍ध अंतर हो सुखे।।१२।।

१३. शिर-काया-आणि ग्रीवा
अचल ठेवूनि मोकळे।
निसिकाग्रावर असावे
द्यान सारे निश्चले।।१३।।

१४. शांत मानस आणि इंद्रिय
ब्रम्हचर्योपासना।
चित्तमजप्रत दृढ धरावे,
नित्य सद्‌सद्‌र्चिंतना।।१४।।

१५. करूनि चित्ताचे सुनियमन
अर्पूनि मन मजप्रतं।
परमशांति प्राप्त होई
मोक्षनिर्वाणि हो स्थित।।१५।।

१६. अधिक अन्ना सेवने वा
लंघने अति दुःसहे।
घेई जो तैशीच निद्रा
योग त्या ना साहवे।।१६।।

१७. योग्य घे आहार निद्रा
योग्य कर्महो आचरे।
रंजनी जो युक्तसंयत
योग सुखकर त्या नरे।।१७।।

१८. मन स्थिरावे आत्मरूपी
झडति इच्छा-वासना।
योगसाधन नित्य राही
योगी तो कुरूनंदना।।१८।।

१९. दिप स्थिर निर्वात क्षेत्री
हालतो ना डोलतो।
तैसे मानस योगियाचे
ऐक आणिक सांगतो।।१९।।

२०. करूनि मानस सुनियंत्रित
चित्तवृत्ती आवरी।
आत्मतत्वे हो सुदर्शन
शांति उपजे अंतरी।।२०।।

२१. अमृताचे स्निग्ध शिंपण
बुद्धि-मानस अनुभवी।
परमशांति अन सुखावी
उघडते कक्षा नवी।।२१।।

२२. मिळवूनि त्या चिद्सुखाला
बुद्धिमानस स्तब्धते।
विसरूनि सामान्य भोगा
चित्त त्यांते गुंगते।।२२।।

२३. दुःख त्यजणे-मुक्त होणे
योग हा कुरूनंदना।
दृढव्रती जो दृढविरक्ता
तोच योगी अर्जुना।।२३।।

२४. त्याजुनि संकल्प सारे
सावरे मन चंचला।
इंद्रियेही वश करोनि
स्थिर होई निश्चला।।२४।।

२५. आचरावा योग पार्था
दृढबुद्धि भावने।
होई प्रगति उत्तरोत्तर
निश्चये त्या सज्जने।।२५।।

२६. धावे मन-अस्थिर त्याला
समजुतिने आवरावे।
प्रेमकुशले मानसा त्या
आत्मरूपी तोषवावे।।२६।।

२७. स्थिर आणि शांत मानस
कामनाही आटल्या
चिद्सुखाने योगियांच्या
दशदिशा कोंदटल्या।।२७।।

२८. स्थिर करूनि चित्तवृत्ती
पापदोषां पारखे।
ब्रम्हस्पर्शी पावे राया
योगी अत्याधिक सुखे।।२८।।

२९. भूतमात्रांचे ठिकाणी
घेई दर्शन आपुले
"सर्व जग माझे ठिकाणी"
विश्वमन होई खुले।।२९।।

३०. पाही जो मजलाच जगती
आणि जग माझे स्थिती।
पारखे नच एकमेका
आम्ही प्रतिक्षण संगती।।३०।।

३१. पावूनि एकात्म भावा
ध्यायतो मज पूजितो।
प्रिय मजला योगी ऐसा
मद्स्थिता निज राहतो।।३१।।

३२. पाहे जगती निजरूपाला
हर्ष-खेदही सारखे।
"मीच सृष्टी" ही अवस्था
वेगळेपण नच उरे।।३२।।

३३. "विश्वरूपमित्र" ही अवस्था
लवण जैसे सागरे
आपुला आणिक परका
भेद ऐसा ना उरे।।३३।।

अर्जुन म्हणाला :

३४. चित्तवृत्ति संयमाचा
योग हा मधुसुदना।
वाटतो अप्राप्य मजला
आवरू कैसे मना।।३४।।

३५. चपल-चंचल-थोर-बलप्रद
स्थूल आणिक सूक्ष्मही।
आवरू कैसे मनाला
जिंकी जे पवनासही?।।३५।।

श्री भगवान म्हणाले :

३६. अर्जुना संदेह नाही
प्रबल चंचलता मना।
बाणवी वैराग्य करिसी
साधना दिन-प्रति-दिना।।३६।।

३७. नाही संयम ज्या नराला
योग त्याला दुःष्कर।
संयमी जो स्थिर साधक
योगस्थित हो तो नर।।३७।।

अर्जुन म्हणाला :

३८. काय गति हो त्या नरे
जो योगमार्गे भ्रष्टला
असूनि श्रद्धा आणि भक्ति
मुक्ति आधिच थांबला।।३८।।

३९. लोक ना-परलोक त्याला
सांपडे अति संकटी।
क्षुद्र अभ्रापरी भ्रमोनि
छिन्न होई शेवटी।।३९।।

४०. हाच संशय मनी उपजला
सांग उत्तर केशवा।
पूर्ण योगी-पूर्ण-ज्ञानी
हे मुरारी माधवा।।४०।।

...८...

श्री भगवान म्हणाले :

४१. ऐक माझे वचन पार्था
सांगतो मी निश्चये
नष्ट ना हो भक्त माझा
लोकी वा परलोकीये।।४१।।

४२. पुण्यलोकी तो सुखाने
मिळवी साधुसंगति।
योग्यकाली ये धरेवर
जन्मुनि कुळी सुस्थिती।।४२।।

४३. जन्मतो वा तो महात्मा
थोर योगियांचे घरी
जन्म ऐसा जाण दुर्लभ
अर्जुना अवनीवरी।।४३।।

४४. पूर्वसंचित ज्ञान त्याला
प्राप्त हो कुरूनंदना।
थोर तप आरंभ करी तो
शमदमादिक साधना।।४४।।

४५. पूर्वविद्येच्या प्रभावे
योगपंथा येई तो।
योगकुतुहल भावनेने
शब्दब्रम्हा लांघतो।।४५।।

४६. सतत उद्यमसाधनेने
शुद्ध होऊन अंतरी
जन्मजन्मांतर प्रवासे
होई अंती मद्रुपी।।४६।।

४७. कर्म आणिक ज्ञानमार्गी
वा कुणी संन्यासिकॉ
योगी त्याहुन श्रेष्ठ पार्था
म्हणूनि होसी योगिक।।४७।।

४८. श्रेष्ठ साऱ्या योगियांते
जाण तो कुरुनंदना।
भक्तिभावे जो स्मरे मज
सततं रतं मद्‌साधना।।४८।।

४९. मीच व्यष्टी अनं समष्टी
मीच जगता व्यापिले
मीच साधन-साध्य-साधक
दैत सारे संपले।।४९।।

५०. जाण त्याला भक्त उत्तम
योग त्याला साधला।
मीच माझ्या हृदयकमळी
तो महात्मा पुजिला।।५०।।

**।।श्री भवद्‌गीता उपनिषदातील, ज्यांत ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, "ध्यान योग" नामक सहावा अध्याय समाप्त झाला।।**

# ।।अध्याय क्रमांक ७।।

## ।।ज्ञानविज्ञान योग।।

श्री भगवान म्हणाले :

१. येउनि तू शरण मजसी
चित्त ठेवूनि मजप्रती।
जाणिसी मज पूर्णरूपे
ऐक पार्था निश्चिती।।१।।

२. ज्ञान मी सांगेन आणिक
देई अनुभव सत्वरे।
जाणिल्यावर जाणणे बघ
शेष ना काही उरे।।२।।

३. थोर दुर्लभ ते महात्मे
जे करी तपसाधना।
त्यातही कुणी एक समजे
मज यथार्थे अर्जुना।।३।।

४. बुद्धि-जल-आकाश-वायु-
अग्नी, मानस-"मी"पणा।
बुद्धि संगे अष्टधाही
प्रकृति कुरूनंदना।।४।।

५. अष्टधा शक्तिस म्हणती
"अ-परा" हे अर्जुना।
चेतना जगतास देई
ती"परा", रिपुकंदना।।५।।

६. सर्व भुते उपजती
ह्या दोन शक्तिच्यामुळे।
अखिल जगता जनन-प्रलयन
माझिया शक्तिबळे।।६।।

७. श्रेष्ठ काही अधिक नाही
मजहूनि तुज आकळे।
जाण मजला सूत्र ज्यांते
सृष्टीरूप मणि ओवले।।७।।

८. जलामधले मी जलत्व
शशीरवींची मी प्रभा।
मी नरांचे पौरूषत्व
प्रणव मी वेदोऽत्मवा।।८।।

९. गंध मी गंधित धरेचा
अग्नीमाजी तेज मी।
चेतना मी त्या जगाची
तापसांचे तपस मी।।९।।

१०. बीज आदि मीच, त्यांतुन
प्रसविले ब्रम्हांज मी।
बुद्धिवंते मीच बुद्धि
निजस्वरूपी तेज मी।।१०।।

११. मीच बल अन मीच शक्ति
रहित राजसवासना।
धर्मसंमत काम जाणि
मजसी कुंतीनंदा।।११।।

१२. थोर ते त्र्यैगुण्य पार्था
उद्भवे मजपासुनि।
लिंपती नच मजसि त्रैगुण
पार मी त्यांचेहुनि।।१२।।

१३. झाकिती त्रैगुण मजला
योगमाये अर्जुना।
विसरती जन निजस्वरूपा
गुणबले कुरूनंदना।।१३।।

१४. मायेचा आभास पार्था,
दुर करणे दुष्कर।
शरण येती जे मला ते
पार होती सत्वर।।१४।।

१५. आसुरिक मती वर्तनाचे
मूढ मजला विसरती।
"कोण भगवान" ह्या अहंते
दोषचक्रे गुंतति।।१५।।

१६. थोर सुकृत पुण्य ज्यांचे
भजति जन प्राधान्यतः।
आर्त-अर्थार्थि व ज्ञानी
कौतुहल चातुर्विधा।।१६।।

१७. आवडे ज्ञानी विशेषे
जो समर्पित मजप्रती।
आत्मप्रगती होई त्याची
ऐक पार्था निश्चिती।।१७।।

१८. थोर सारे भक्त माझे
श्रेष्ठ पण ज्ञानी जगा।
स्थिर मानस-चित्त-बुद्धि
ध्यान प्रत्यही मजलगी।।१८।।

१९. बहुत जन्मांतून फिरोनी
ज्ञानी समजे गुह्य ते।
कृष्णमय हे विश्व सारे
थोर तो माझ्या मते।।१९।।

२०. काय होई त्या जनांते
भ्रष्टली ज्यांची मती।
पूजिती ते अन्य देवां
नियमतं ते पाळिती।।२०।।

२१. भक्त भजतो ज्या प्रकारे
भाव मी देतो तया।
दृढ तयाची करूनि श्रद्धा
घेई माझ्या आश्रया।।२१।।

२२. भजति मज तो ज्या स्वरूपे
पावतो तैसाच मी।
कामना आणिक इच्छा
पुरविणारा देव मी।।२२।।

२३. मागति बुद्धिनुरूपे
फलही त्यां तैसे मिळे।
भक्त माझे येती मजप्रत
अन्य होती वेगळे।।२३।।

२४. अल्पबुद्धि जाणिती मज
सगुणरूपी देवता।
नाकळे माझी तयांना
अव्ययी विश्वात्मता।।२४।।

२५. योगमायेच्या प्रभावे
दृष्य ना हो सहज मी।
मूढ जन ना जाणिती मज
अव्ययी परब्रम्ह मी।।२५।।

२६. पूर्व-भावी-वर्तमाना
ज्ञान मजला अर्जना।
जाणितो मी सकल भूता
ओळखे मज कोणी ना।।२६।।

२७. द्वेष आणिक कामनेच्या
द्वंद्वयुद्धे अडकुनि
भूतमात्रे गुंतति बघ
जन्ममृत्यु बंध मी।।२७।।

२८. द्वंद्वमोहातित महात्मे
थोर ज्ञानी दृढव्रती।
पापमुक्त होऊनि ते
हो समर्पित मजप्रती।।२८।।

२९. शरण येती जन मला जे
मोक्षसाधन पाळिती।
ब्रम्ह आणिक कर्म तैसे
आत्मज्ञाना जाणिती।।२९।।

३०. भूत-दैव-अध्यात्म-यज्ञे
एक तत्व, ते जाण मी।
समजतो हे गुह्य ना हो
दूर तो मजपासुनि।।३०।।

३१. विकल होती भूत मात्रे
अंतःकाली अर्जुना।
भक्त राही स्थिर, पाही
विश्वरूप नारायणा।।३१।।

**।।श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद वर्णिलेला आहे, "ज्ञानविज्ञान योग" नामक सातवा अध्याय समाप्त झाला।।**

## ।।अध्याय क्रमांक ८।।

## ।। अक्षरब्रम्ह योग ।।

अर्जुन म्हणाला :

१. ब्रम्ह म्हणजे काय कृष्णा
काय ते अध्यात्म रे
दैव-आधि, आधिभूत म्हणजे
काय सारिसी सत्वरे।।१।।

२. कोण आणिक होई कैसा
यज्ञअधि मधुसुदना।
मृत्युसमयी जाणितो तुज
स्थिर कैसा सांग ना।।२।।

श्री भगवान म्हणाले :

३. नष्ट ना हो जे कधिही
नित्य आणिक शाश्वत।
ब्रम्ह जाणि ते बिभित्सो
अ-क्षर, सर्व-स्थित।।३।।

४. शरीरमात्री वास करिते
ब्रम्ह, ते अध्यात्म रे।
उगम हो भूतादिकांचा
ज्यामुळे, ते कर्म रे।।४।।

५. नष्ट हो अधिभूत अर्जुन,
पुरूष हो अधिदैवता।
जाणि मज अधियज्ञ देही
निश्चये पांडुसुता।।५।।

६. अंत्यसमयी देहत्यजला
जो सूरे मज निग्रहे।
येई मजप्रत तो महात्मा
विलीन होई मद्रूपे।।६।।

७. मृत्युसमयी ज्या विचारी
देह त्यागे मानव।
जन्म घेई त्याचि रूपे
नियम हा सृष्टीद्भव।।७।।

८. म्हणूनि पार्था सर्व समये
ध्यान माझे ठेविसी।
युद्‌ध करिसी यज्ञभावे
स्थान माझे पाविसी।।८।।

९. साधना अन तपबलाने
ठेवी मानस स्थिर जो।
ध्यान करितो सतत माझे
दिव्य मद्रुप पावितो।।९।।

१०. सर्व ज्ञानी सर्व साक्षी
सूक्ष्मअति अधिशासक।
सर्व धाता तो अचिन्त्या
प्रखर अति तमनाशक।।१०।।

११. आदिपुरूषा ध्यायतो जो
मृत्युकाली निग्रही।
प्राण आणूनि भुवोर्मध्ये
पावी मजला निश्चयी।।११।।

१२. वेदज्ञानी म्हणती ज्याते
अक्षर कुरूनंदना।
योगी साधक मिळती ज्यासी
घेऊनि निःष्कामना।।१२।।

१३. बंद करूनि देहद्वारां,
स्थिर करी जो मानसा।
मस्तकी धरी प्राणशक्ती
मत्परी धरी चेतनसा।।१३।।

१४. वदतसे ॐकार पावन
स्मरूनि मजसी अर्जुना
देह त्यजता येई मजप्रत
निश्चये कुरूनंदना।।१४।।

१५. सुलभ माझी प्राप्ती पार्था
निश्चये त्या योगिया।
सतत घेई ध्यास माझा
येउनि मम आश्रया।।१५।।

१६. जन्म घेणे जाण पार्था
कष्टप्रद अतिदुःखद।
जे महात्मे येती मजप्रत
पाविती पद शाश्वत।।१६।।

१७. नाही कुठला लोक ऐसा
जरी विरंची भुवनी।
येर-झाऱ्या संपती ना
सुटति त्या मज पावूनि।।१७।।

१८. दिवस ब्रम्हाचा सहस्त्रक
वर्ण जाणिसी अर्जुना
रात्रही तैशीच जाणे
ज्ञानी तो कुरूनंदना।।१८।।

१९. व्यक्त होती भूतमात्रे
दिवस जेव्हा संभवे।
विलीन होती रात्रकाली
स्थिती अव्यक्त उद्‌भवे।।१९।।

२०. चक्र हे चाले अखंडित
जन्ममृत्युचे सदा।
व्यक्त होणे दिवसकाली
विलीन हो अधारता।।२०।।

२१. नष्ट होते सर्वकाही
तत्व राही मागुता।
तेचि अव्यय, सूक्ष्म अतिशय
ते सनातन शाश्वता।।२१।।

२२. अविभाजित मूळ तत्वा
जाणि अक्षर निश्चये।
श्रेष्ठ त्याहुनि अधिक काही
नाही, जाणिती योगिये।।२२।।

२३. स्थान अक्षय-अतिव सुखकर
श्रेष्ठ सर्वोत्तम गति।
जाण पार्था धाम माझे
योगि ज्यांते ध्यायति।।२३।।

२४. परमपुरूषा ध्यायतो जो
करूनि चित्ता अर्पण।
अखिल सृष्टीजगतं स्वामि
जो जगाचे कारण।।२४।।

२५. ऐक पार्था तू सविस्तर
काल निश्चित कोणता।
मुक्त हो योगी प्रयाणी
योई वा तरी मागुता।।२५।।

२६. अग्नी-ज्योती-शुक्ल पक्षी
उत्तरायण दिवस हा।
मार्ग क्रमुनि ब्रम्हवेत्ते
मजप्रति येती पहा।।२६।।

२७. धुम्र-रात्री-कृष्ण पक्षी
दक्षिणायन अर्जुना।
तेज चंद्राचे मिळूनि
परत येती कवना।।२७।।

२८. तेज आणिक कृष्ण
ऐसे मार्ग हे कुरूनंदना
मोक्षदायक एक दुसरा
आणितो चक्री पुन्हा।।२८।।

२९. मार्ग जाणूनि दोन ऐसे
योगी हो प्रश्नातित।
सत्य तत्वी रोवूनि मन
स्थिर हो योगास्थित।।२९।।

३०. जाणि जो ह्या परम योगा
मुक्त होई अक्षय।
यज्ञदाने आदिकांहूनि
श्रेष्ठ फल हे निश्चय।।३०।।

**।।श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांच्या संवाद आहे, अक्षर परब्रम्ह योग नामक आठवा अध्याय समाप्त झाला।।**

## ।।अध्याय क्रमांक ९।।

## ।। राजविद्याराजगुह्य योग ।।

श्री भगवान म्हणाले :

१. द्वेष आणि मत्सराने
त्यागिलेल्या अर्जुना।
पापनाशक ज्ञान कथितो
ऐक हे कुरूनंदना।।१।।

२. ना मिळे ज्याची प्रचिती
ज्ञान नाही पूर्ण ते।
सिद्‌ध होई अनुभवांति
जाणिशी, विज्ञान ते।।२।।

३. तीच पार्था सांगी तुजला
परमविद्या आज मी।
"राजविद्या-राजगुह्या"
ऐक तू रणसंयमी।।३।।

४. शास्त्र हे अतिश्रेष्ठ पार्था
गुह्य परमं अति पावन।
पालनासी सहज सोपे-
अक्षय, वीरोत्तम।।४।।

५. भक्ति नाही ज्या नराला
वचन माझे लांघतो।
येई ना मजप्रत कधी तो
चन्मचक्री गुंततो।।५।।

६. सर्व जगात सूक्ष्मरूपे
व्यापिले मी निश्चये।
नांदते जग मजठिकाणी
धारिले जग मी स्वये।।६।।

७. धारितो मी जरी तयांना
लिप्त ना होई तरी
जनन-प्रलयन मद्प्रभावे
पृथक राही अंतरी।।७।।

८. थोर अवकाशी स्थिरावून
रायु फिरतो लिलया।
सर्वभुते मज ठिकाणी
वसती पार्था निश्चया।।८।।

९. प्रकृतिते विलीन होती
कल्प-अंती जीवजडे
कल्प आरंभ तेव्हा
प्रकटती माझ्या बने।।९।।

१०. जनन मरणाचा पसारा
चालवे मम प्रकृति
विवश होऊनि भूतमात्रे
जन्म चक्री गुंतति।।१०।।

११. थोर हा जरी खेळ चाले
मुक्त मी त्यापासुनी।
मी उदासीन मी विमुक्त
पृथक कर्मांपालूनी।।११।।

१२. जाण मजला परम चालक
अधिन माझ्या प्रकृति।
सृजन-पालन आणि विघटन
तीच घडवी प्रत्यही।।१२।।

१३. दिव्य माझे रूप आणिक
श्रेष्ठ मी परमेश्वर।
जाणिती ना मूढ मजला
समजती नश्वर नर।।१३।।

१४. वृथा आशा-ज्ञान-कर्मे
जे विवेके लोपले।
पाविती ते असुर जन्मा
मृगजळी जे भ्रांतले।।१४।।

१५. जाण पार्था ते महात्मे
जाणिती मज ईश्वर।
ध्यान करिती सतत माझे
जाणिती मज अ-क्षर।।१५।।

१६. भजन-पूजन आणि चिंतन
दृढ भक्ति साधना।
तुष्ट-स्थिर जे अतःकरणी
श्रेष्ठ ते कुरूनंदना।।१६।।

१७. ज्ञानयज्ञे भजति मजला
विविध मार्गे ज्ञानिये।
द्वैत वा अद्वैत किंवा
विश्वतोमुख भावने।।१७।।

१८. यज्ञक्रतु-अग्नी व समिधा
मंत्र-औषध-धृत-स्वधा।
द्रव्य-अर्पण आणि भोक्ता
मीच रूपी बहुविधा।।१८।।

१९. अखिल जगता मीच पालक
जनक-प्रपिता-जननी मी।
वेद्य मी-ॐकार आणिक
वेद पावन खचित मी।।१९।।

२०. मीच ईश्वर सर्वसाक्षी
परमशाश्वत धाम मी।
सृजन पालन आणि प्रलयन
बीज-आदि-स्थान मी।।२०।।

२१. मीच वन्ही मीच वर्षा
मीच त्यांचे कारण।
मीच अमृत आणि मृत्यु
सत्-असत् हे अर्जुन।।२१।।

२२. जाणिती जे वेद तिन्ही,
करीती यज्ञादि साधना।
स्वर्ग लोका पाविती ते
पुण्य मिळवुनि अर्जुना।।२२।।

२३. पुण्य जेव्हा सरते सारे
येती मग अवनीवरी।
चक्र चाले सतत ऐसे
गुंतती ते त्यापरी।।२३।।

२४. होती मजप्रत लीन आणिक
चिंतति मज ध्यायति।
योग आणिक क्षेम त्यांचे
वाहतो मी निश्चिती।।२४।।

२५. अन्य देवां भजति कोणी
लीन श्रद्धा भावने।
जाण नकळत भजति मज ते
भिन्न जी अधिसाधने।।२५।।

२६. मीच भोक्ता सर्वयज्ञे
मीच ईश्वर अर्जुना
जाणिती नच अज्ञ जन हे
भटकती पुनःपुनः।।२६।।

२७. देव-पितृ-भूत आदिक
विविध श्रद्धा स्थानके।
भक्त त्यांचे मिळती त्यांसी
भक्त मम हो मजकडे।।२७।।

२८. फूल-फळ-वा पान साधे
तोच जरीही अर्पिले।
प्रेमभावे ग्रहण करमी मी
शुद्ध चित्ता जाणिले।।२८।।

२९. कोणतेही कार्य करिसी
भक्षसि वा अर्पिसी।
तीच पूजा-यज्ञ पार्था,
कृष्ण-अर्पण जाणिसी।।२९।।

३०. सूर्यकिरणे सारखी जगी
जाण मज त्यांचे परी।
प्रिय ना अप्रिय कोणी
भक्त पण हो मद्‌रूपी।।३०।।

३१. अधम-पापी कोणी मानव
पूजितो मज निश्चये।
वाट धरिली योग्य त्याने
सांगतो मी तुज स्वये।।३१।।

३२. धर्म होतो उदय हृदयी
तिमीर पापाचा विरे।
जाण माझे वचन निश्चय
भक्त माझा उद्‌धरे।।३२।।

३३. पाप किंवा नीच योनि
जन्मला कोणी तरी
येई जर ममआश्रयाते
धारि त्याला मी शिरी।।३३।।

३४. थोर ब्राम्हण राजऋणीही
शरण आले मजप्रती।
दुःखदायक ह्या जगी बघ
ना रमे त्यांची मती।।३४।।

३५. चित्त धरिसी मद्‌ठिकाणी
बुद्धि करी मम अर्पण।
जाण मजसी साध्य अंतिम
पाविसी नारायण।।३५।।

**।।श्री भगवद्‌गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, राजविद्या-राजगुह्य योग नामक नववा अध्याय समाप्त झाला।।**

# ||अध्याय क्रमांक १०||

## || विभूति योग ||

श्री भगवान म्हणाले :

१. ऐक माझे वचन श्रेष्ठा
वदतो तुज हितकारणे
ऐकिसी तू बोल माझे
विनयभक्ति भावने||१||

२. जन्म किंवा उगम माझा
देव-ऋषी ना जाणिती।
स्त्रोत त्यांचा मीच ऐसे
समजसी त्वा निश्चिती||२||

३. मी अनादि मी महेश्वर
खूण पटली ज्या नरा।
पाप लांघे तो महात्मा
जाणिसी हे नरवरा||३||

४. ज्ञान-बुद्धि-सत्य-शम-दम
हर्ष दुःख किंवा क्षमा
जन्म-मृत्यु अभय वा भय
जाणिसी वीरोत्तमा||४||

५. दान-तप आणि अहिंसा
यश पराभव तुष्टता
जाण तू तैशीच समता
भाव हे कुंतीसुता||५||

६. जाण मजला उगम त्यांचा
ऐक आणिक सत्य हे।
चार मनू आणिक सप्तम
त्रपषीही मन्मनी प्रसविले।।६।।

७. शक्ति आणिक तेज माझे
घेऊनि पांडुसुता।
सृष्टी सारी प्रसविली
ही ऐक लिला अद्‌भूता।।७।।

८. थोर माझी योगमाया
जाणितो जो योगिया।
साधला अतियोग त्याला
समज ऐसे निश्चया।।८।।

९. मीच कारण ह्या जगाचे
मी उगम अतिशाश्वत
जाणूनि हे गुह्य ज्ञानी
मद्रुपी होती रत।।९।।

१०. चित्त ठेवूनि मज ठिकाणी
रंगी माझे रंगति।
संग करूनि सज्जनांचा
बोधति अन तोषति।।१०।।

११. प्रितीपूर्वक भजति मजला
भावने दृढनिश्चये।
देतसे मम प्राप्तिसाधक
बुद्धियोगा त्यांसये।।११।।

१२. प्रेम अन अमुकम्पनेने
ज्ञान देई मी तया।
तश्वण ज्ञानाचे उजेडी
अज्ञतम जाई लया।।१२।।

अर्जुन म्हणाला :

१३. तूच असशि परम ईश्वर
धाम शाश्वत ब्रम्ह तू।
तूच अक्षर नित्य देवा
अखिल सृष्टी व्याप्त तू।।१३।।

१४. असित नारद आणि देवल
व्या़स आदिक ऋषीमुनी
सांगती तव किर्ती महिमा
तव प्रभावा वर्णूनी।।१४।।

१५. वदसि मजला स्वमुखे
ते मानितो मी निश्चिती।
देव किंवा असुर नाही
तवस्वरूपा जाणिती।।१५।।

१६. तूच जाणि़सी तू स्वतःला
निश्चिती नारायणा।
आदिउगमा भूतनाथा
सृष्टीपती अतिपावना।।१६।।

१७. कथन कर मज दिव्य विभूति
वसति ज्या सृष्टीमधे।
तेज आणिक सत्त्व प्रकटे
जाणि मी तुज त्यांमधे।।१७।।

१८. वर्णिसी तव योगशक्ति
आणि किर्ती संपदा।
तृप्ती ना होई कंशी बघ
ध्यास तव वचनामृता।।१८।।

श्री भगवान म्हणाले :

१९. ऐक पार्था विभूति वर्णन
थोर आणिक अद्‌भूता।
तत्त्व कुठले प्रकट होई
कोण स्थळी प्राधान्यता।।१९।।

२०. मीच आत्मा गुडाकेशा
भूतमात्री संभवा।
मीच आदि मध्य मी
अन अंतही मी पांडवा।।२०।।

२१. द्वादश आदित्य त्यांते
विष्णु मी पांडुसुता।
देई मी नवचैतन्य भूतां
सूर्य मी तेजस्विता।।
मरूत देती वायु त्यांते
श्रेष्ठ मरीची जाण मी।
उजळली नक्षत्रे त्यांते
चंद्रमा तेजस्वी मी।।२१।।

२२. श्रेष्ठ सारे वेद त्यांते
सामगायन खचित मी।
इंद्र साऱ्या देवतांते
परम दैवी शक्ति मी।।
इंद्रियांते मीच मानस
मीच शक्ति चेतना।
भूतमात्री वास करीतो
जाण निश्चित अर्जुना।।२२।।

२३. रूद्र ते गंभीर त्यांते
श्रेष्ठ जो महाईश्वर।
काम ज्याने जाणिला
तो मीच निग्रही शंकर।।
दिव्य गुण अन संपदांचा
साधनांचा स्वामि मी।
वित्तईश मी यक्ष-स्वामि
सर्वसंपन्न कुबर मी।।
अष्टवसु अतिप्रबल त्यांते
पावक उबदार मी
उंच शिखरे त्यांत पार्था
शिखर मेरू जाण मी।।२३।।

२४. धर्मवेत्ते जे पुरोहित
मी बृहस्पती त्यांतला।
ज्ञानसागर म्हणूनि निर्गव
ऐक हे रणशार्दला।।
थोर रणरोनानी त्यांते
स्कंदकार्तिकेय मी
जलनिधी विस्तीर्ण त्यांते
जाण सागर खचित मी।।२४।।

२५. तापसी ऋषी अन महर्षि
जाण भृगु मज त्यातला।
जाण मज ॐकार अक्षय
अक्षरी समुहातला।।
अर्पिणे काही स्वतःचे
यज्ञ त्याला जाणिती।
अर्पिले जाते स्वतःला
यज्ञजप मी त्यांप्रती।।
स्थिर अचल धरणीवरी जे
मी हिमालय त्यांतला।
विपुल सृष्टीचा पसारा
मीच मजवरी धारिला।।२५।।

२६. अश्वत्थ मी वृक्षांतला
जो वृक्ष पावन शाश्वत।
प्रातःसमयी पूज्य ऐसे
देवऋषि मी नारद।।
तज्ज्ञ जो गुणकौशलांते
चित्ररथ गंधर्व मी।
सिद्‌ध मुनींते जाण पार्था
सिद्‌धयोगी कपिल मी।।२६।।

२७. उद्‌भवे जो अमृताते
अश्व उच्चैःश्राव मी।
अश्व असती बहुत त्यांते
वेगशक्ति अथक मी।।
थोर गज सामर्थ्यसाली
श्रेष्ठ मी ऐरावत।
जाम मजला मानवांते
उच्च नेता, भारत।।२७।।

२८. आयुधे बहुविध त्यांते
वज्र मी अतिदुष्कर।
गाय जणू दुसरीच माता
कामधुक् मी नरवर।।
प्रजनकारक प्रेरणा
तो धर्मसंमत काम मी।
वासुकी सामर्थ्यशाली
सर्पयोनित जाण मी।।२८।।

२९. नागयोनित मीच वसतो
होऊनि ना-अंत मी।
जाम मजस तू अनंत
जलप्रदायक करूण मी।।
पितृलोकी जाण मजसी
अर्यमा पांडुसुता
संयमी जितुके मी त्यांते

३०. दैत्यलोकी वसतो पार्था
होऊनि प्रल्हाद मी।
गणक अन परिमाण त्यांते
जाण शाश्वत काल मी।।
विविध पसु कित्येक त्यांते
जाम मजसी केसरी
गरूडपक्षी मीच किरीटी
पक्षीसमुहाचे शिरी।।३०।।

३१. जाण पावन पवन मजला
पावनांते अर्जुना
शस्त्रधारी कैक त्यांते
राम मी कुरूनंदना।
मत्स्यकुली सामर्थ्यशाली
मकर मी पांडुसुता।
थोर गांगा जीवदात्री
जाहलो बघ मी स्वतः।।३१।।

३२. जाहले उत्पन्न त्यांचा
आदि-मध्य अन अंत मीं।
श्रेष्ठ जी अध्यात्मविद्या
तीच पार्था जाण मी।।
वाद असति विविध त्यांते
श्रेष्ठ तो संवाद मी।
प्रश्न फिटता अतरीचे
जो उरे तो बोध मी।।३२।।

३३. जाणिसी 'अ'कार मजला
अक्षरांते अर्जुना।
जोडणारा दोन शब्दां
द्वंद्व मी कुरूनंदना।।
मीच अक्षय काल पार्था
अंतहीन अतिशाश्वत।
वांछिले ते पूर्ण देण्या
विश्वमख मी निश्चित।।३३।।

३४. मीच मृत्यु सर्वहर्ता
मी भविष्य अव्यक्तता।
स्त्री गुणांते मीच किर्ती
वाणि मेघा धःमता।।
जाण मजसी तू क्षमा
तू जाण मजसी संपदा।
मीच स्मृती हे जाण पार्था
नित्य विभुति सर्वदा।।३४।।

३५. सामवेदी बृहत्साम
अन हृदसमुही श्रेष्ठ मी।
गायने ज्या तेज उमळे
छंद तो गायत्री मी।।
ब्रम्हसमय जो देवतांचा
मास मार्ग-शिर्ष मी।।
सर्व ऋतुंत्रत श्रेष्ठ ऐसा
राजऋतु वासंत मी।३५।।

३६. फसविणारा द्युत मी
अन तेजसांचे तेज मी।
कर्मउद्यम करीती त्यांना
लाभणारा विजय मी।।
मीच श्रमसामर्थ्य पार्था
सुफल मी साफल्य मी।
सात्विकांचे सत्व आणिक
धःमतांचे धैर्य मी।।३६।।

३७. कृष्णीकुल सामर्थ्यशाली
वासुदेव मी त्यांमधे।
थोर पांडव पांचही पण
मी धनंजय त्यांमधे।।
पुज्य असतो सर्व मुनींते
व्यासमुनी मी त्यांतला।
दीर्घदृष्टी कविजनांते
शक्र मी कवी उशना।।३७।।

३८. दंड मी सामर्थ्यसाली
धर्मअंकुश ठेवी मी।
विजय इच्छुक योजिती ती
विजयकारक निती मी।।
मौन मी गुह्यांतरी
बघ ज्ञानियांचे ज्ञान मी।
बुद्धिकर्ते मित्र मनुजे
विनय मी स्वाध्याय मी।।३८।।

३९. बाण आदि सर्वभूती
मीच त्यांची चेतना।
चलित किंवा अचल सृष्टी
मम प्रभावे अर्जुना।।३९।।

४०. अंत नाही मम विभूति
जाण शत्रूभंजना।
वर्णिले संक्षेप पाळूनि
मी स्वये कुरूनंदना।।४०।।

४१. तेज-बल-संपन्न आणिक
पूर्ण वैभव युक्त जे।
जन्मले मम दिव्य स्त्रोते
निश्चये त्वां जाणिजे।।४१।।

४२. काय सांगू अधिक पार्था
योगशक्ति वर्णूनि
धारिले जग अल्पअंशे
मीच जगता व्यापुनि।।४२।।

**।।श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, विभूतियोग नामक दशम अध्याय समाप्त झाला।।**

## ।।अध्याय क्रमांक ११।।

## ।।विश्वरूप संदर्शन योग ।।

अर्जुन म्हणाला :

१. होऊनि कृपावंत स्वामि
ज्ञान मज दिधले स्वये।
मोह गेला विरूनि माझा
भ्रांतिही जाई लये।।१।।

२. कमल पत्र सौंदर्यनेत्रा,
दिव्य तुमची प्रकृति।
आदि-अंत-भूतांचे कारण
तुम्हीच देवा निश्चिती।।२।।

३. दिव्य रूप तुमचे पहावे
हीच इच्छा कामना।
विश्वरूप तुमचे दिसावे
हीच स्वामि प्रार्थना।।३।।

४. योग्यता परखुन माझी
काढी निष्कर्ष ईश्वरा।
शक्य जर तरी दाखवावे
विश्वरूप ह्या पामरा।।४।।

श्री भगवान म्हणाले :

५. पाहुनि घे दिव्यरूपे
आज माझी अर्जुना
विविधरूपी, विविधवर्णी
अंत ना, त्यां पाड ना।।५।।

६. पाहुनि घे तू आदित्यां
मरूत-अश्विन अन वसु।
लोकपालां आणि रूद्रां
पाहुनि घे आज तू।।६।।

७. जे चराचर सृष्टीस्थानी
कांसासी जे दर्शना।
पाहशी ते मम ठिकाणी
आज कुंतीनंदना।।७।।

८. ना समर्थ तव चर्मचक्षु
योगऐश्वर्य पाहण्या
दिव्यदृष्टी अर्पितो तुज
रूप वैश्विक दर्शण्या।।८।।

संजय म्हणाला :

९. वदुनि ऐसे पांडवाला
रूप अद्‌भुत दाविले।
परमयोगी श्रीहरीने
वचन सार्थकी लाविले।।९।।

१०. वदन आणिक नयन अद्‌भुत
विविध रूपे प्रकटली।
दिव्य अस्त्रे-दिव्य शस्त्रे
दिव्यभूषणं ल्यायली।।१०।।

११. दिव्य माला दिव्य वसने
दिव्य गंधे लेपिली।
विश्वमुख आगणित रूपे
अर्जुनाने पाहिली।।११।।

१२. काय वर्णू तेज त्याचे
काय वर्णू ती प्रभा।
सहस्त्रावधि सूर्य जैसे
तळपती एका नभा।।१२।।

१३. पाहिले कुरूनंदनाने
अखिल ब्रम्हांड देही त्या।
भाग अन उपभाग त्याचे
एकवटले पूर्णता।।१३।।

१४. रोमहर्षित जाहलेला
पार्थ विनये वाकला।
वंदुनि पुरूषोत्तमाला
पुढील वचने बोलला।।१४।।

अर्जुन म्हणाला :

१५. पाहतो मी देवसमुहा
भूतमात्रे सर्वही.
कमल आसनी स्थिर ब्रम्ह्य
थोर ऋषी अन् सर्पही।।१५।।

१६. दिसत नाही उगम किंवा
मध्य अंत जरी शोधता।
बाहु-मुख-उदरे पसरली
नयन अगणित अद्भुता।।१६।।

१७. किरीट-चक्रा धरिले
त्वां धरिली दुःसह गदा।
प्रखर ज्वाला उसळती
तव तेज वाटे भयप्रदा।।१७।।

...८...

१८. तुम्हीच अक्षर तुम्ही सनातन
धर्मरक्षक शाश्वता।
तुम्हीच अव्यय ज्ञेय अंतिम
आदिपुरूष हे मन्मता।।१८।।

१९. नाही आदि-मध्य किंवा
अंतही कुणी पाहिला।
नेत्र जणू शशी - सूर्य तुमचे
प्रलय का हो मांडिला?।।१९।।

२०. प्रखर तेजे शुष्कते
ब्रम्हांड सारे थरथरे।
व्यापिले त्रैलोक्य तुम्ही
धैर्य ना मजप्रत उरे।।२०।।

२१. हो प्रविशिष्टित विश्वरूपी
देवचमु अति विस्मये।
सिद्ध मुनी करी स्वस्तिवाचन
कांपिती कोणी भये।।२१।।

२२. रूद्र-वसु-आदित्य-अश्विन
मरूतं पितृ आसुरे।
यक्ष-किन्नर-सिद्ध सारे
बघति रूपा विस्मये।।२२।।

२३. रौद्र दाढा-रौद्र बाहु
रौद्र नयने पाहुनि।
भान जगताचे उडाले
विकल मी भितीकारणी।।२३।।

२४. व्यापिले ब्रम्हांड तुम्ही
मुख भयंकर आपुले।
नेत्र तुमचे तप्त लाव्हा
धैर्य माझे संपले।।२४।।

२५. प्रलयवन्ही भासते
तव वदन दिसते चहुकडे।
शांति-धृति मम नष्ट झाली
देह माझा लडखडे।।२५।।

२६. सारे कौरव भीष्म आणिक
द्रोण कर्ण रणकर्कश
आमुचेही प्रमुख योद्धे
अनियंत्रित परवश।।२६।।

२७. पाहतो मी जात असती
तव मुखी हे ईश्वरा।
दंतयंत्री चूर्ण होती
दृष्य हे अतिभयकरा।।२७।।

२८. थोर सरीता असीम वेगे
मिळती जैशा सागरा।
वाहती तैसेच योद्धे
अग्नीमुकि प्रलयांकरा।।२८।।

२९. भासती मजला पतंगे
अग्नी जे कवटाळिती।
नाश हो संपूर्ण त्यांचा
हेही तैसे धाविती।।२९।।

३०. ग्रास करूनि विविध लोका
अधर अपुले चाटिसी
जाळिसी अतितप्त तेजे
सृष्टी तू संहारिशि।।३०।।

३१. नमन करूनि प्रश्न करीतो
भक्त किंकर आपुला।
कोण आपण काय हेतू
नाश जगता मांडिला?।।३१।।

श्री भगवान म्हणाले :

३२. काल मी अतिश्रेष्ठ पार्था
सृष्टीनाशा ठाकलो।
लढसी ना जर तू
तरीही नाश अटळ, हे निश्चयो।।३२।।

३३. मारीले आधि तयांना
मीच पार्था लिलये।
उठ घे चल शस्त्र हाती
पाविती किर्ती जये।।३३।।

३४. कर्ण किंवा द्रोण-भीष्म
धूर्त कपटी जयद्रथ।
मारीले बघ मी तयांना
हो निमित्त हनुमत्‌रथ।।३४।।

संजय म्हणाला :

३५. ऐकुनि हे वचन राजा,
पार्थ स्तंभित जाहला।
जोडुनि कर भीतभीते
नम्रभावे बोलला।।३५।।

अर्जुन म्हणाला :

३६. गायने तव किर्तीमहिमा
विश्व सारे मोदले।
त्राही होई राक्षसांते
सिद्ध ते प्रणिपातले।।३६।।

३७. तूच असशि परम-आत्मा,
अक्षर, अतिशाश्वत।
तूच असशी उगम आदि
परम-ईश अति अद्भूत।।३७।।

३८. तूच आदि पुरूष देवा
तूच आदि कारण।
ज्ञेय आणिक तूच ज्ञाता
करीसी जगता धारण।।३८।।

३९. तूच वायु-वरूण-अग्नी
तूच ब्रम्हा अन शशी।
होऊनि यम करीसी नियमन
तूच प्रपिता सृष्टिशी।।३९।।

४०. करीतो वंदन मी महात्म्या
दशदिशांतून माधवा।
तूच व्यष्टी अन समष्टी
तूच सृष्टी केशवा।।४०।।

४१. समजूनी तुज मर्त्य मानव
प्रिय साथी सोबती।
बोललो त्वां "कृष्ण....यादव....."
अज्ञ होतो निश्चिती।।४१।

...८...

४२. जाहले असणार काही
चूक वर्तन आगळे।
माफ करीशी ईश्वरा मज
मूर्खता अजी आकळे।।४२।।

४३. सृष्टीपती तू लोकनाथा
तूच सद्‌गुरू माधवा।
कोण आहे श्रेष्ठ तुजसम
तूच प्रियतम केशवा।।४३।।

४४. म्हणूनि करीतो नमन तुजला
पाव तू मज ईश्वरा
जाण मजला पुत्र किंवा
मित्र प्रितीसागरा।।४४।।

४५. हर्षलो जरी बघुन अद्‌भूत
मन भयाने व्यापिले।
दाखवी तव रूप प्रेमळ
हेच तुजला प्रार्थिले।।४५।।

४६. चार भुजा अभय मुद्रा
किरीट-चक्रा धारिले।
रत्नजडित गदशस्त्र हाती
रूप ते मी कांक्षिले।।४६।।

श्री भगवान म्हणाले :

४७. प्रितीकारणी जाण पार्था
योगमाये मी स्वये।
दाविले मी रूप ज्याचा
थांग ना कोणास ये।।४७।।

४८. यज्ञदानेतपस किंवा
वेदध्याये ना मिळे
तूच पार्था पाहिलेसी
रूप माझे आगळेष।।४८।।

४९. व्यथित ना हो कुंतीपुत्रा,
रौद्ररुप मम पाहुनि।
दावितो मी हे धनंजय
रूप माझे मानवी।।४९।।

संजय म्हणाला :

५०. धीर देऊनि अर्जुनाला
विश्वरूपा आवरी।
सौम्य सोज्वळ श्याम सुंदर
रूप घेती श्रीहरी।।५०।।

अर्जुन म्हणाला :

५१. पाहुनि हे रूप तुमचे
चेतना आली पुन्हा।
प्रेमसागर मूर्ती सुंदर
देखणी, नारायणा।।५१।।

श्री भगवान म्हणाले :

५२. रूप दुर्लभ जाण पार्था
आज तव मी दाविले।
देवही झुरती मनोमन
पाहण्या मम अतिबले।।५२।।

...१०...

५३. वेदध्याये, यज्ञ किंवा
दानतपसे ना मिळे।
पाहण्यासी रूप वैभव
विश्वव्यापी आगळे।।५३।।

५४. शुद्ध भक्ति-प्रेम-निष्ठा
ठेवूनि कुरूनंदना।
भक्त माझा जाणतो
होई मद्रुप अर्जुना।।५४।।

५५. कर्म करी ममकारणी
जो ध्यायतो, मज पूजितो।
वैर ना धरी भूतमात्री
मुक्त, तो मज पावितो।।५५।।

**।।श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, विश्वरूपसंदर्शन योग नामक एकादश अध्याय समाप्त झाला।।**

## ।। अध्याय क्रमांक १२।।

## ।। भक्तियोग ।।

अर्जुन म्हणाला :

१. सगुण भक्ती कोणी करीतो
कोणी निर्गुण ध्यायतो।
कोण त्यांते श्रेष्ठ योगी
सांग मजला हे प्रभो ।।१।।

श्री भगवान म्हणाले :

२. चित्त मजप्रत गुंतले
जे ध्यायति मज दृढव्रते।
थोर श्रद्धा ठेविती
ते श्रेष्ठ योगी मन्मते।।२।।

३. ध्यान करीती अ-क्षराचे
निर्गुणा जे ध्यायती।
जाणती कूटस्थ-अचला
परमशक्ती मानिती।।३।।

४. करीती संयम इंद्रियांचा
स्थिर बुद्धि ठेविती।
भूतमात्री प्रेम करीती
श्रेष्ठ तेही निश्चिती ।।४।।

५. क्लेष असती अधिक पार्था
मार्ग निर्गुण ध्यायना।
दुःखप्रद अति कष्ट काटक
निर्गुणि आराधना।।५।।

६. कर्म करीती मज समर्पण
ध्यायति दृढनिश्चये।
जाणिती मज साध्य अंतिम
थोर ऐसे योगिचे।।६।।

७. उद्धरी ऐशा जनांसी
वचन सांगे सत्य मी।
मृत्युसागर ह्या जगाचा
करूनि देतो पार मी।।७।।

८. स्थिर करी मनबुद्धि मस्थित
प्रत्यही मम साधना।
वास करीशी नित्य मद्रुपी
ऐक हे कुरूनंदना।।८।।

९. नाही चित्ता स्थैर्यता तर
शास्त्रवेदिक साधना।
पालने त्या सुलभ होई
प्राप्ति माझी अर्जुना।।९।।

१०. गमले तुजला तेही दुष्कर,
कर्म कर तू मजप्रती।
कारणि मम कर्म करूनि
पाविसी मग निश्चिती।।१०।।

११. शक्य नाही वाटले तर
मार्ग आणिक अर्जुना।
कर्मफल करी मजसी अर्पण
करूनि माझे चिंतना।।११।।

१२. पुस्तकी अभ्यास हितकर
ज्ञान त्याहून चांगले।
ध्यान त्याहून श्रेष्ठ अंती
शांती त्यागातून मिळे।।१२।।

१३. भूतमात्री प्रेम करीतो
जो कृपाळू निर्गवी।
सुखदुःखी सम विचारी
द्वेष ज्यांसी ना शिवी।।१३।।

१४. विजितइंद्रिय तृप्त योगी
बुद्धि मजप्रत अर्पितो।
दृढइच्छाशक्ती ज्याची
भक्त मजला प्रियतो।।१४।।

१५. देई ना उद्वेग कोणा
शांती ना ज्याची ढळे।
क्रोध-भिती-दर्ष-मत्सरी
मुक्त, तो मज तोषवे।।१५।।

१६. शुद्ध आणिक दक्ष, ठेवी
वृत्तीही निरपेक्ष जो।
सांडिले कर्तेपणाला
आवडे मज भक्त तो।।१६।।

१७. जो उदासिन द्वेषमुक्ता
द्वंद्व जाणूनि सांडले।
परिप्लुत जो भक्ती भावे
भक्त तो मज आवडे।।१७।।

१८. मान वा अपमान किंवा
शत्रू मित्री साम्यता।
शीत-उष्ण, सुख-दुःख वाटे
सम जयासी तत्वता।।१८।।

१९. वंदिले वा निंदिले
ते सारखे वाटे जया।
स्थिर जो अनिकेत मौनि
तृप्त मजसि प्रिया।।१९।।

२०. पाळती जे धर्म अक्षय
वर्णिला जो मी स्वये।
भक्त श्रद्धावान ऐसे
प्रिय मजला निश्चये।।२०।।

**।। श्री भगवद्‌गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, भक्तियोग नामक द्वादश अध्याय समाप्त झाला।।**

# ।।क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग योग।।

अर्जुन म्हणाला :

१. पुरूष आणिक प्रकृतिचा
काय संबंध माधवा।
क्षेत्र-क्षेत्रज्ञ, ज्ञान-ज्ञेया
सांगिशी मज केशवा।।१।।

श्री भगवान म्हणाले :

२. ह्या शरीरा 'क्षेत्र' ऐसे
म्हणति पार्था ज्ञानिये।
जाणितो क्षेत्रास त्याला
समज 'क्षेत्रज्ञ' निश्चये।।२।।

३. मीच ज्ञाता विविध क्षेत्री
मीच क्षेत्रज्ञ अर्जुना।
क्षेत्र-क्षेत्रज्ञ विषयी असे
ते ज्ञान हे कुरूनंदना।।३।।

४. क्षेत्र म्हणजे काय
त्याचे गुणविकारही कोणते।
काय असती शक्ती त्याच्या
ऐक मन्मत निश्चिते।।४।।

५. गायले जे ऋषीमुनी जन
विविध छन्दी सूत्रके।
सांगुनि निश्चित मतासी
तर्क ही अती नेटके।।५।।

...२...

६. पंचभूते, 'मी' पणा अन
बुद्धि भूता प्रकृति।
इंद्रिये दश आणि मानस
पंचविषय जे इंद्रियी।।६।।

७. द्वेष-इच्छा, सुख-दुःखही
चेतना आणि धृति।
अवयवांचा संघ बनुनी
क्षेत्र बनते निश्चिती।।७।।

८. विनय-शुच-निरपेक्षबुद्धि
भूतमात्री मित्रता।
धैर्य-क्षान्ति-स्थैर्य-दृढता
गुरूजनांसी पूजिता।।८।।

९. इंद्रिये रसविमुखता अन
त्यागिलाही 'मी ' पणा।
जरा-व्याधि-जन्म-मृत्यु
जाणि त्यांना जो उणा।।९।।

१०. जो विरक्ता पाश-विन्मुख
पुत्र-दारा-गृह पती।
स्थिर राही बुद्धि येवो।
चांगली वा दुःस्थिती।।१०।।

११. करूनि अर्पण भक्ती मजप्रत
सेवितो एकान्त जो।
मग्न होऊन आत्मरंगी
ध्यायतो मज सतत तो।।११।।

१२. नित्य रत अध्यात्ममार्गी
साध्य मजला जाणितो।
"ज्ञान हेचि - अन्य मित्थ्या"
ज्ञानी ऐसे मानितो।।१२।।

१३. नाही आदि-उगम ब्रम्हा
ऐक मम वचनामृते।
सत्-असत् ह्या द्वंद्व भावे
पार निर्गुण तत्व ते।।१३।।

१४. व्यापुनि ब्रम्हांड सारे
हस्त-पादे-शिर-मुखे।
चक्षु-श्रवण तैसेच विस्तृत
ब्रम्ह विस्तरले सुखे।।१४।।

१५. तत्व निर्गुण सगुण झाले
व्यक्त हो अव्यक्त जे।
खेळ भोगे त्रैगुणांचा
त्रिगुण-आतित असूनि ते।।१५।।

१६. तत्व मूलं-तरी पृथक राही
जाण चर जरी अचर ते।
सूक्ष्म अती-ना थांग लागे
निकट तरी अती दुर ते।।१६।।

१७. एकरूपी, अ-विभाजितं
भासे तरीही पृथक तो।
जननं धारणं आणि पालनं
प्रलय लिळे मांडतो।।१७।।

१८. जाहला हृदयस्थ पार्था
परम आत्मा तेजसे।
ज्ञेय अंतिम तो तमातित
भूतमात्री वसतसे।।१८।।

१९. क्षेत्र-क्षेत्रज्ञ ज्ञान पार्था
वर्णिले मी तुज स्वये।
जाणूनि जे भक्त माझा,
येई मजप्रत निश्चये।।१९।।

२०. आदि नाही प्रकृतिला
आणि पुरुषा निश्चिती।
प्रकृति जननी जगाची
गुणत्रयीचा उगम ती।।२०।।

२१. देह आणिक इंद्रियांना
प्रकृति प्रसवे पहा।
हर्ष दुःखा अनुभवे
तो पुरुष निश्चित जाण हा।।२१।।

२२. प्रकृतिने स्थिर होऊन
पुरुष गुणत्रय अनुभवे।
गुणविकारे जन्म त्याचा
विविध योनिंत संभवे।।२२।।

२३. परमपुरुषा जाण पार्था
परमकर्ता धारता।
परमभोक्ता तो महेश्वर
जाण क्षेत्रज्ञ भारता।।२३।।

२४. जाणितो हे ज्ञान पार्था
पुरूष प्रकृति तत्व जो।
जन्मचक्री गुंततो नच
मृत्युचक्री भेदतो।।२४।।

२५. ध्यानमार्गे ध्यायति कुणी
स्व-रूपासि अर्जुना।
सांख्यमार्गी - कर्मयोगी
विविध पथ जन विचलना।।२५।।

२६. सेविती कुणी भक्तीभावे
सगुण भक्ती नवविधा।
भक्तियोगे भेदिती ते
मृत्युचक्रा सहजता।।२६।।

२७. जन्मते सृष्टीमधे जे
कुंतीपुत्रा अर्जुना
क्षेत्रक्षेत्रज्ञ कार्यकारण
जाण हे कुरूनंदना।।२७।।

२८. अमर-अक्षय-तत्व-शाश्वत
विवध क्षेत्री नांदते।
ज्ञानी पाहे ज्ञान नेत्रे
जाणतो मज निश्चिते।।२८।।

२९. प्राप्य अंतीम पुरुष-उत्तम
जाणतो नर, ज्ञानी तो।
साधना-तप-शुद्ध कर्मे
परम साध्य साधतो।।२९।।

३०. प्रकृतिद्भव कर्मसारी
कर्म आतित ब्रम्ह ते।
स्थिर आत्मा आत्मरूपे
ज्ञानी जाणे निश्चिते।।३०।।

३१. विविध योनी, विविध भूते
कैक तारामंडले।
तत्व त्यांते नांदे एकच
ज्ञानियाने जाणले।।३१।।

३२. उमजुनि एकात्मतेला
अनुभवे नर थोर जो।
लांघुनि सामान्यतेला
ब्रम्हरूपा पावतो।।३२।।

३३. जो गुणतित - जो अनादि
अमर अ-व्यय अ-क्षर।
सहज नांदे, शुद्ध रूपे
मर्त्य क्षेत्री सुस्थिर।।३३।।

३४. पसरले आकाश जैसे
सूक्ष्मरूपी चहूकडे।
लिंपू ना शकते कुणीही
व्यापिली मी जीव-जडे।।३४।।

३५. सूर्य जैसा स्थिर जागी
करी प्रदिप्तित विश्व हे।
क्षेत्र तैसे हो प्रकाशित
ब्रम्ह लिले जाण हे।।३५।।

३६. क्षेत्र-क्षेत्रज्ञ ज्ञान ऐसे
पुरूष प्रकृति जाणिती।
पार होती मृत्युचक्री
स्थान अंतिम पाविती।।३६।।

**।। श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, क्षेत्र-क्षेत्रज्ञविभाग योग नामक त्रयोदश अध्याय समाप्त झाला।।**

# ।। अध्याय क्रमांक १४ ।।

## ।। गुणत्रयविभाग योग ।।

श्री भगवान म्हणाले :

१. कथन करतो ज्ञान तुजप्रत।
श्रेष्ठ निश्चित मन्मने।
परमसिद्धि प्राप्त केली।
मिळवूनी ज्या मुनिगणे।।१।।

२. प्राप्त करूनि ज्ञान पार्था,
जाहले ममरूप जे।
जन्ममृत्यु चक्र भेदूनि
द्वंद्व अतित थोर ते।।२।।

३ प्रकृति ही महदयोनि
जाण मज बीजप्रद पिता।
जन्म घेती सर्व भूते
त्यामूळे पाडूसूता।।३।।

४. जे कुणी उत्पन्न होती
ज्या कुणा योनिंमधे।
प्रकृति माता तयांची
मी पिता हे निश्चिते।।४।।

५ प्रकृतिद्‌भव गुण अलौकिक
सत्व-रज-तम जाणिसी।
बांधिती जिवात्म पुरूषा
त्रिगुण महिमा ऐकिसी।।५।।

६. सत्वगुण तेजस्वी-निर्मल
सुखप्रदायक तत्वता।
ज्ञानसाधक म्हणूनि तोषक
सत्वगुण पांडुसुता ।।६।।

७. रजसगुण सामर्थ्यशाली
जागवी तृष्णा महा।
कर्म इच्छा प्रवण गुण रज
बांधतो जीवास हा।।७।।

८. तमसगुण अज्ञानकारक
मोह-आळस-बंधना।
जीव बनतो मूढ-निष्क्रिय-निसुग
जाणि अर्जुना।।८।।

९. सत्व गुण आनंदकारी
रजस कार्याप्रवण रे।
ज्ञान झाके तम भयानक
हो प्रभावी जीव रे।।९।।

१०. त्रैगुणांचा खेळ चाले
सतत हे कुरूनंदना।
एक कुणी होई प्रभावी
अन्य दोंवरी अर्जुना।।१०।।

११. देहद्वारांतून बिभत्सो
ज्ञानकिरणे फाकिती।
सत्वगुण तेथे प्रभावी
जाण पार्था निश्चिती।।११।।

१२. लोभ-आशा-कार्य-तृष्णा
जेथ दिसती अर्जुना।
रजस गुण अग्रमी तेथे
जाणिसी कुरुनंदना।।१२।।

१३. दाटला अंधार सारा
मोह-आळस-अज्ञता।
तमसगुण बलवान तेथे
समज तू पांडुसुता।।१३।।

१४. सत्व हो प्रवृद्ध जेव्हा
मृत्यु ज्यासी गाठतो।
जातसे तो थोर लोकी
श्रेष्ठ संगत मिळवितो।।१४।।

१५. कर्मप्रवण लोकांत जन्मे
देह त्यागुनि राजसी।
मूढ योनित जन्म घेई
देहपतनी तामसी।।१५।।

१६. सकृतांचे फलित पार्था
शुद्ध-सात्विक चांगले।
दुःख फलित बघ राजसाचे
मूढता तम प्रसविले।।१६।।

१७. ज्ञान हो उत्पन्न सत्वी
लोभ ये रजसातूनि।
मूढता आणिक प्रमादे
येती तमसाकारणी।।१७।।

१८. सत्व ने प्रगतिपथावरी
रजसी स्थिर ऐके स्थिती।
तमस नेई नीच गतिसी
ऐक त्यांची फलश्रुति।।१८।।

१९. कर्मबधा होई कारण,
गुणत्रयांचा खेळ हा।
पृथक "मी" अतित त्यांच्या
ज्ञानिया जाणे पहा।।१९।।

२०. पार करतो त्र्यैगुणांना
जो महात्मा जीवनी
जरा-व्याधि-जन्म-मृत्यु
लांघे, हो संजीवनी।।२०।।

अर्जुन म्हणाला :

२१. त्र्यैगुणाहीत जो महात्मा
काय त्याची लक्षणे
पार कैसा करीतसे तो
बलविशाली त्र्यैगुणे?।।२१।।

श्री भगवान म्हणाले :

२२ ज्ञान वा प्रवृत्ति किंवा
मोह ऐशा त्रयस्थिती।
भावभावे स्थिर राही
ज्ञानिया तो निश्चिती।।२२।।

२३. ना ढळे ज्ञानी समत्वी
कोणत्याही कारणे।
कर्मकारक गुणत्रयी हे
जाणतो निश्चितपणे।।२३।।

२४. मानितो सम हर्ष शोका,
मृत्तिकेपरी कांचना।
प्रिय अप्रिय राग निंदा
सारखे त्या, अर्जुना।।२४।।

२५. मान वा अपमान तैसे
मित्र-रिपूही सारखे
त्यागितो कर्तुत्व भावा
नांदतो ज्ञानी सुखे।।२५।।

२६. एक निष्ठे-भक्तीभावे
सेवितो मज ज्ञानिया।
योग्य तो ब्रम्हाधिकारा
त्रैगुणातित योगिया।।२६।।

२७. मीच अव्यय ब्रम्ह-अक्षर
परमपावन धाम मी।
मीच अक्षय धर्म पार्था,
अतिव सुख आनंद मी।।२७।।

।।श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद वर्णिलेला आहे,गुणत्रय विभागयोग नामक चतुर्दश अध्याय समाप्त झाला।।

## ।।अध्याय क्रमांक १५।।

## ।।पुरुषोत्तमप्राप्ती योग।।

श्री भगवान म्हणाले :

१. उर्ध्वभागी मुळे -
शाखा खालती विस्तारिल्या।
पर्ण ज्याचे वेद ऐसा
वृक्ष अश्वत्थ वर्णिला।।१।।

२. गुणरसाने पुष्ट होऊन,
वाढती शाखा पहा।
विषयवस्तु लोभ नूतन
सतत डवरे वृक्ष हा।।२।।

३. पसरले उपमूळ खाली,
मनुजलोका अंतरी।
कर्म-आशाबंधनाने,
होई त्याची विस्तृती।।३।।

४. उगम किंवा मध्य ह्याचा
अंतही कुरूनंदना।
पहिला विस्तार ह्याचा
ना कुणी हे अर्जुना।।४।।

५. असंगाचे शस्त्र होऊन
छेदसी हा दृढव्रते।
परमधामी पावण्याचा
यत्न करिसी निश्चिते।।५।।

६. जन्मचक्री येरझाऱ्या
जेथ सारे थांबते।
परमपुरूष तो आद्य उगमा
प्राप्त कर हे रणपते ।।६।।

७. मानमोहा जिंकुनि अन्
आत्मरूपी तोषुनि
पार करुनि द्वंद्व ज्ञानी
परमस्थाना पाविती।।७।।

८. परतणे त्या जन्मजक्री
मद् निधानी थांबते।
सूर्य-शशी-अग्नी प्रभावळ
ना घरा मम उजळते।।८।।

९. दिव्य जरीही त्या विभूती
तेज त्यांचे फिकुटते
धाम माझे जे अलौकिक
ब्रम्हतेजे फाकते।।९।।

१०. जीव-आत्मा याभिधाने
अंश माझा नांदतो
जीवलोकी वास करितो
प्रकृतिसव राहतो।।१०।।

११. इंद्रिये आणिक मानस
यांसवे हे अर्जुना।
पुरूष देही वास करीतो
आणिसी कुरूनंदना।।१।।

१२. श्रोत्र-चक्षु-स्पर्श-रसना
घ्राण-मन ह्या सांधिके।
विषय रस आस्वाद घेई
पुरूष देही कौतुके।।१२।।

१३. विमुढ बुद्धि गुंतति त्या
विषयरस अती सेवती।
त्रैगुणांचा खेळ सारा
जाणती ज्ञाते मुनी।।१३।।

१४. ज्ञानचक्षुच्या प्रभावे
ज्ञानी जाणिती गुह्य हे।
मूढ जे विषयी विकारी
समजती ना तत्व ते।।१४।।

१५. तेज शशी-सूर्यात नांदे
आणि वसते पावकी।
जाण ते माझेच पार्था,
वचन मम हे निश्चिती।।१५।।

१६. पृथ्वीमाजी वास करूनि
धारितो ही सृष्टी मी।
चंद्र होऊन औषधींना
पोषतो रे खचित मी।।१६।।

१७. प्राणिमात्री जठर अग्नी
सेवितो अन्नास जो
जीवदात्री शक्ती देई
जाण पार्था मीच तो।।१७।।

१८. स्थिर मी हृदयस्थ भूतां
ज्ञान-स्मृती मम कारणे
नाश त्यांचा होई पार्था
जाण मम बल कारणे ।।१८।।

१९. वेदकर्ता मीच राया,
वेद्य पार्था खचित मी।
जाणितो मी अर्थ त्यांचा,
अर्थ त्यांचा जाण मी ।।१९।।

२०. पुरूष असती दोन जगति
क्षरं-आणिक अ-क्षरं।
मर्त्य असती भूतमात्रे
कूटस्थ म्हणजे अ-क्षर।।२०।।

२१. पृथक त्यांहूनि हे बिभित्सो,
पुरूष उत्तम ईश्वर।
व्यापिले अणू रेणू ज्याने
परम अव्ययी अ-क्षर।।२१।।

२२. मर्त्य पुरूषा पार करूनि
अ-क्षरा ओलांडिले
पुरूष-उत्तम म्हणूनी पार्था
वेदत्रयींनी जाणिले।।२२।।

२३. मोह ज्याचा नष्ट झाला
ज्ञान=तप=बल साधने।
जाणूनि पुरूषोत्तमाला
सेवितो शुचिभावने।।२३।।

२४. गुह्य हे अतीथोर तुजप्रत
वर्णिले मी निश्चिते।
मर्त्य मानव मुक्त होई
सेवूनि ह्या अमृते।।२४।।

**।। श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, पुरूषोत्तमप्राप्ती योग नामक पंधरावा अध्याय समाप्त झाला ।।**

# ।। अध्याय १६ ।।

## ।। दैवासुरसंपद्विभाग योग ।।

श्री भगवान म्हणाले :

१. सत्वहृदयी - दानी - निर्भय
ज्ञान - योगे दृढमती।
विजित इंद्रिय, यज्ञ-तापस
सत्य-आर्जव निश्चिती।।१।।

२. त्यागभावी - शांती - मार्दव
भूतमात्री स्नेहता।
त्यागिली हिंसा लबाडी
स्थिर बुद्धि धीमता।।२।।

३. तेज-धृति-मांगल्य-शुचिता
दंभ-मत्सर त्यागिता।
संपदा दैवी गुणांची
जाण ऐसी भारता।।३।।

४. गर्व उन्नत - दंभ - औद्धत
क्रोध - काठिण्य मूढता।
आसुरी गुण आसुरांचे
जाणिसी पांडुसुता।।४।।

५. दैवी गुण सुखमोक्षदायक,
बंधकारक आसुरी।
असशी दैवीगुण सुमंडित,
शोक त्यज हे नरवरी।।५।।

६. सृष्टीमाजी दोन वृत्ती
दैवी आणिक आसुरी।
असुरवृत्ती काय लक्षण
जाण तू मम वैखरी।।६।।

७. जाणिती नच शौच-सुचिता
सत्यमार्गी विमुखता।
काय हितकर, वा अहितकर
अविवेकी मूर्खता।।७।।

८. "कोण ईश्वर - सत्य कुठले
सृष्टी उद्‌भव मैथुनि...
....जगत मित्थ्या अप्रतिष्ठित....."
वदती हे प्रतिपादुनि।।८।।

९. धरूनि अगणित काम इच्छा
दंभ - मानी - मदबले।
मोह आश्रीत दुष्ट भावे
कार्य करिती दुःष्कले।।९।।

१०. काम - तृष्णा विविध, त्यांचे
पूर्तिकारण चिंतती।
जळति चिंता अग्नीदाही
जन्मभर ते दुर्मति।।११।।

११. बद्ध होऊनि काम - क्रोधे
पाश -आशे गुंतती।
त्यजुन संमत न्याय मार्गा
अमित वैभव जमविती।।११।।

१२. "प्राप्त केले थोर वैभव
भोग हे भोगिन मी .......।
......मीच स्वामी ह्या धनाचा
नित्य धन-बलवान मी"।।१२।।

१३. "कोण मजसम शत्रूहर्ता
वीर मी बलशाली मी ....।
....सतत विजयी मीच ईश्वर
सर्वगुणसंपन्न मी"।।१३।।

१४. "मीच मजसम ह्या ठिकाणी
कुलिन वैभवी उच्च मी .....।
मीच दाता-मीच दानी
अखिल जगति स्वामी मी"...।।१४।।

१५. मोहजाले बद्ध होऊन,
कामचक्री गुंतुनि।
नरक दुष्कर रचति आपण
आपुल्या कर्मातूनि।।१५।।

१६. थोर भरली ज्या अहंता
अंध होऊनि मद-धने।
यज्ञ-दाने करिती आपुल्या
किर्ती-नामा कारणे।।१६।।

१७. दर्प-बल आणि अहंता
क्रोध-कामी दास्यता।
द्वेष धरिती मज ठिकाणी
देही मी जरी भारता।।१७।।

१८. दुष्ट ह्या अधमोत्तमांना
असुर योनित धाडी मी।
जन्मचक्री पतित होती
होई त्यां दुष्प्राप्य मी।।१८।।

१९. आत्मनाशक नरकद्वारे
तीन असती अर्जुना।
काम-क्रोध आणिक लोभही
जाणिसी कुरूनंदना।।१९।।

२०. त्रिविध द्वारे मुक्त जो
तो घोर वर्तन आचरे।
प्राप्त होई परम गतिसी
ऐक माझे वचन रे।।२०।।

२१. कामप्रेरित ज्याचे वर्तन
त्यागिली शास्त्रे-विधी।
पूर्णता आनंद ना त्या
ना मिळे उत्तम गति।।२१।।

२२. शास्त्र-शुचिता-विनय-बुद्धि
मार्गदर्शी भारता।
श्रेयसाची कास धरूनि
कर्म करी पांडुसुता।।२२।।

**।। श्री भगवद्गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद ह्याचे वर्णन आहे, दैवासुरसंपद्विभागयोग नामक सोळावा अध्याय समाप्त झाला।।**

## ।। अध्याय क्रमांक १७ ।।

### ।।श्रद्धात्रयविभागयोग।।

अर्जुन म्हणाला :

१. यज्ञदाने करिती भावे,
सांडुनि शास्त्रेविधी
त्रैगुणात्मक काय निष्ठा
सांग मज करूणानिधी।।१।।

श्री भगवान म्हणाले :

२. त्रैगुणे अनुरूप पार्था,
पृथक श्रद्धा जाणिसी।
तामसी-रजसिक-सात्विक
वर्णने ह्या ऐकिसी।।२।।

३. मूळ वृत्ती ज्या प्रकारे
त्यागुणे श्रद्धा वसे।
जैसी श्रद्धा तैसे जीवन्
नियम सोपा हा असे।।३।।

४. देवतांना भजति सात्त्विक
यक्ष-राक्षस राजसी।
भूतप्रेते पूज्य ज्यांना
जाण त्यांना तामसी।।४।।

५. घोर तप आणिक तंत्रे
कामपूर्तिकारणे
पाळती ते त्यजुनि शास्त्रे
मूढ दांभिक दुर्जने।।५।।

६. देह आणिक इंद्रियांना
तप्त करीती मूर्खते।
देहस्थित परमेश्वराला
तस्त्र करिती असुर ते।।६।।

७. यज्ञ तप आणिक दाने
त्रैगुणि कुरूनंदना।
प्रिय जो आहार सर्वा
तोही त्रिगुणिक अर्जुना।।७।।

८. वृद्धिकर्ते सुख-बलायु
मोद-प्रिती वर्धिते
स्निग्ध पोषक अन्न ऐसे
सात्विकांना प्रिय ते।।८।।

९. उष्ण-कडू-आचीरूक्ष-दाहक
आम्ल-लवणे युक्त जे।
रजसगुण जनी प्रिय ऐसे
दुःख वर्धक अन्न ते।।९।।

१०. अन्न जे रसहीन झाले
अन्य भूते सांडिले
कुबट ते दुर्गंधकारी
तमसिकांना आवडे।।१०।।

११. त्यागुनि इच्छा फालाची
यज्ञ यज्ञा कारणे
जाण ऐसा यज्ञ सात्विक
शुद्ध चित्ती धारणे।।११।।

१२. पूर्ण करण्या काम-ईप्सित
किर्ती वा संपादने।
यज्ञ ऐसा जाण रजसिक
जो अहंता कारणए।।१२।।

१३. नाही निष्ठा नाही श्रद्धा
मंत्रविधी धुडकाविणे।
दक्षिणआ ना हवि-प्रसादे
तमस यज्ञी लक्षणए।।१३।।

१४. देवद्विज-गुरू प्राज्ञ पूजन
सत्य-मृदुता-सरळता।
ब्रम्हचर्य आणि अहिंसा
हे देह तप कुंतीसुता।।१४।।

१५. सत्य-प्रेमळपिय-हितकर
ना कुणा उद्वेगिता।
परम-पावन-मंत्र-जापन
वचन तप हे निश्चिती।।१५।।

१६. सौम्य-स्थिर-शुच-शांत मानस
दृढविनिग्रही मौनता।
जाण तप ऐसे मनाचे
नरवरा पांडुसुता।।१६।।

१७. त्रिविध तप ऐसे हे किरीटी
पाळिती दृढनिश्चये।
शुद्ध, श्रद्धा, ना फलाशा
सात्विके ते ज्ञानिये।।१७।।

१८. तपस साधन करिती पालन
मान-सन्मार्य दांभइके।
क्षणिक-चंचल तपस ऐसा
पाळिती ते रजसिके।।१८।।

१९. मूढबुद्धि मूढभावे
देहपीडन युक्त जो
नष्ट करण्या अन्य कोणआ
तपस तामस जाण तो।।१९।।

२०. दान केले ठेवूनि जे
प्रेम-आदर-भावना
योग्य देशे-काल-पात्रे
जाण सात्विक अर्जना।।२०।।

२१. दंभमूलक फलभिलाषक
प्रत्युपकारण तत्वता
दान ऐसे जाण रजसिक
कुंतीपत्रा निश्चिता।।२१।।

२२. योग्य स्थल वा काल किंवा,
पात्र नाही देखिले।
दाविला अनुदार ऐसे
दान तमसिक जाणिले।।२२।।

२३. "ॐ तत् सत्" नामाभिधाने
जाणिसी परब्रम्ह ते
जाहली उत्पन्न ज्यांतून
यज्ञ-दाने-ब्राम्हणे।।२३।।

२४. उच्चारूनि ॐकार पावन
यज्ञतपदाने क्रिया
ब्रम्हवादी ज्ञानी करिती
जाणिसी शत्रुंजया।।२४।।

२५. वदुनि पावन 'तत्' करिती
दान-जय-तप-साधना।
मोक्षकांक्षि त्रानी सांडी
फलभोग-इच्छा-कामना।।२५।।

२६. सत्य शाश्वत-अमर-अक्षय
परम पावन तत्व जे।
जाण किरीटी शुचिता कर्मा
'सत्' असे अभिधान ते।।२६।।

२७. यज्ञ तापस दानधर्मे
'सत्' तयांसी जाणिती।
कर्म करणे ईश्वराप्रत
'सत्' तयांसी मानिती।।२७।।

२८. दान-तप या यज्ञकर्मे
जाण निष्फल अर्जुना।
नाही ज्यांते भावश्रद्धा
ती असत् कुरूनंदना।।२८।।

**।। श्री भगवद्‌गीता उपनिषदातील, ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांचा संवाद आहे, श्रद्धात्रयविभाग योग नामक सतरावा अध्याय समाप्त झाला।।**

## ।।अध्याय क्रमांक १८।।

### ।।मोक्षसंन्यास योग।।

अर्जुन म्हणाला :

१. थोर तो संन्यास -
त्याचे तत्व मज समजाविशी।
त्यागही मज पूर्ण रूपे
चक्रधारी सांगिशी ।।१।।

श्री भगवान म्हणाले :

२. काम्य कर्मे त्यागिणे -
'संन्यास' त्याला जाणिती।
त्यागणे फल कर्मउद्भव-
"त्याग" त्यांसी मानिती।।२।।

३. "कर्म सारी दोषमूलक,
उचित त्यांना त्यागणे"।
म्हणती कोणी यज्ञ-दाने-
तपस नाही त्याजणे।।३।।

४. ऐक माझे वचन निश्चित
कुंतीपुत्रा अर्जुना।
त्रिविधरूपी त्याग, ऐसे
जाणिसी वीरोत्तमा।।४।।

५. यज्ञ-दाने-तपस, पार्था
साधने शुचि निश्चिती।
पालने हो मनुज पावन
ज्ञानी ऐसे जाणिती।।५।।

६. त्यागुनि आशाभिलाषा,
मोह ना फलकामना।
यज्ञ-दाने-तपस तैसे
आचरावे अर्जुना।।६।।

७. त्यागणे कर्तव्य-कर्मे
जाण अनुचित भारता।
मोहमूलक त्याग त्याला
समज तमसिक निश्चिता।।७।।

८. क्लेशभयाप्रित्यर्थ पार्था,
कर्म त्यजणे आपुले।
त्याग रजसिक जाण ऐसा
नाही फल त्याचे भले।।८।।

९. कर्मप्रित्यर्थ कर्म करणे
त्यागुनि फलकामना।
त्याग सात्विक परम उत्तम
जाणिसी कुरूनंदना।।९।।

१०. प्रिय वा अप्रिय ऐसा
भेद त्यागे ज्ञानिया।
कर्म करी निष्काम भारे
त्यागी सात्विक लिलया।।१०।।

११. नाही संभव पांडुपुत्रा
कर्म सारी त्यागणे।
त्यागितो कर्मोद्भवफलासि
त्यागी त्यासी जाणणे।।११।।

१२. मृत्युनंतर सिद्ध होई,
त्रिविधरूपी भारता।
चांगले-वाईट अथवा
मिश्र फलं कुंतीसुता।।१२।।

१३. ज्ञानिया संन्यस्त पार्था,
कर्मफल जे त्यागतो।
मृत्युनंतर तो महात्मा
जन्मचक्रा भेदितो।।१३।।

१४. पाच असती कारणे
संपन्न करी कर्मास जी।
सांख्यमत ऐ ऐक जिव्हो
कारणए ती कोणती।।१४।।

१५. देह-कर्ता "जीव-आत्मा-
इंद्रिये, हे भारता।
प्राणवायुशक्ती आणिक
दैव, हे पांडुसुता।।१५।।

१६. न्याय्य वा अन्याय्य कर्मे
शरीर-वाचा-मानसे।
जाण पंचम कारणांच्या
बलप्रभावे होतसे।।१६।।

१७. "देहकर्ता - हेच निश्चित"
समजतो मूढाग्रणि
परम आत्मा साक्षी केवळ,
कर्म पंचमकारणी ।।१७।।

१८. त्यागिली कर्तेपणाची
ज्या नराने भावना।
थोर करी संहार तरीही
मुक्त तो, हे अर्जुना।।१८।।

१९. ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान ऐसे
त्रिविध बिज जगकारणी।
करण कर्ता-कर्म जाणि
त्रिपुटी कर्माकारणी।।१९।।

२०. ज्ञान-कर्ता-कर्म त्रीपुटी।
त्र्यैगुणि कुरूनंदना।
कथन करीतो एकचित्ते
ऐक आता अर्जुना।।२०।।

२१. 'अमर-अक्षय तत्व एकच
भूतमात्री अव्ययि'।
जाण सात्विक ज्ञान ऐसे।
हे बिगित्सो निश्चयी।।२१।।

२२. "भूतमात्रे पृथक-त्यांसी
पृथक तत्वे निशचिती"
ज्ञान ते रजसिक पार्था
थोर ज्ञाते जाणिती।।२२।।

२३. बद्ध करीते विषयभोगी
मिथ्य-दोषप्रद असे
ज्ञान ऐसे जाणि तमसिक
अविवेकी हिणकसे।।२३।।

२४. कर्म सात्विक तेच ज्यांते
त्यागिली फलकामना।
प्रिय वा अप्रिय भावा
सांडिले कुरूनंदना।।२४।।

२५. ठेविली मनी बहअहंता
साध्य करण्या ईप्सिते।
कर्म केले बहुप्रयासी
जाण रजसिक निश्चिते।।२५।।

२६. अविवेके-मूढबुद्धि
पाहिला परिणाम ना।
हानी-हिंसा युक्त ऐसे
कर्म तमसिक अर्जुना।।२६।।

२७. जो असंगी-दृढविचारी
लाभहानी स्थिर जो।
त्यागिली ज्याने अहंता
साहसी, सात्विक तो।।२७।।

२८. भाव भावे जो विकारी
कर्मफल ही प्रेरणा।
अशुचित जो दृष्टबुद्धि
राजसिक कुरूनंदना।।२८।।

२९. मूढ-विचलित-ग्राम्य किंवा
दीर्घसूत्री आळशी।
गर्व-उद्धत, शठ-विकारी
तामसी त्या समजशी।।२९।।

३०. बुद्धि-धृतिही त्र्यैगुणात्मक
जाणिसी कुरूनंदना।
सांगतो विस्तारूनी मी
ज्ञान तुज हे अर्जुना।।३०।।

३१. विहित शुद्धाशुद्ध कर्मे
अभय वा भय जाणिते।
बन्ध-मोक्षा पृथक पाही
बुद्धि सात्विक निश्चिते।।३१।।

३२. नेणते जी बुद्धि अनघा
कार्यकारे निश्चित।
धर्मधर्मा नेणते, ती
बुद्धि रजसिक तत्वता।।३२।।

३३. घोर तम अज्ञानरूपी
मोह-आळस प्रिय मना।
त्याज्य वाटे धर्म, ऐसी
बुद्धि तमसिक अर्जुना।।३३।।

३४. धैर्य सात्विक तेचि जिव्हो
प्राण-इंद्रिय-मानसा
योगमार्गे हो नियंत्रित
विमल पावन साहसा।।३४।।

३५. धर्म-अर्थ आणिक कामा
धारितो नर दृढव्रते।
कर्म करितो फलाभिलाषे
धैर्य रजसिक जाण तो।।३५।।

३६. स्वप्न-आळस-शोक-निद्रा
आणि मदबल मूढता
धारितो नर दृढबले ते
धैर्य तमसिक भारता।।३६।।

३७. श्रवण पार्था करीसी आता,
त्रिगुण सुख हे निश्चिते।
थोर यत्नें प्राप्त होई
दुःख अंतक सौख्य ते।।३७।।

३८. भासते जहरी विषारी
प्रथम सेवनी जे मना।
अंती प्रचिती अमृताची
सुख ते सात्विक अर्जुना।।३८।।

३९. सुखंउद्‌भव जे जहाले,
विषय भोगा पासुनी।
वाटले-अमृत, निघाले-
जहर, सुख तें राजसी।।३९।।

४०. जनक ज्याचे घोरनिद्रा
अज्ञता अनं मूढता।
मद-प्रमादे जे विकारी
सुख तामसी, भारता।।४०।।

४१. प्रकृतिद्‌भव त्रैगुणे जो
मुक्त ऐसा अर्जुना।
नाही जगती, देवलोकी
जाणिसी कुरूनंदना।।४१।।

४२. क्षूद्र-वैश्य-क्षत्रिय-ब्राम्हण,
भिन्न त्यांची प्रकृति।
गुण विभागे दिधली त्यांते
विहित कर्मे सहजती।।४२।।

४३. देह-मानस-शौच-तापस
शांती-आर्जव-साधना।
क्षान्ति-श्रद्धा आणि करूणा
विहित कर्मे ब्राम्हणा।।४३।।

४४. धैर्यधारण-तेज-स्थिरता
युद्धकर्मी कुशलता।
दानी-दाता-अभय-त्राता
क्षत्रियां पांडुसुता।।४४।।

४५. वैश्यकर्म वाणिज्य आणिक
गो-कृषि संवर्धना।
वर्णसेवा सहजवृत्ती
क्षूद्रकर्मी अर्जुना।।४५।।

४६. करूनी आपली विहित कर्मे
पूर्ण श्रद्धा भावने।
प्राप्त होई परमसिद्धि
थोर ऐशा सज्जने।।४६।।

४७. मूळ जे ब्रम्हांड कारण
जे चराचर व्यापिले।
कर्मयोगे करूनि पूजन
श्रेष्ठ गति नर पाविले।।४७।।

४८. पाळणे स्व-धर्म श्रयसं
दोषही जरी त्यामधे।
प्रिय जरी परधर्म अनुचित
ऐकिसी हे बलनिधे।।४८।।

४९. कर्म अपुले विहित पार्था
युक्त दोषे भासले।
त्यागणए ना उचित जरीही,
कर्म दोषे व्यापिले।।४९।।

५०. धुम्र करी आवृत्त अग्नी।
दोष झाके कर्म रे
त्यागणे स्वधर्म कर्मा
म्हणून नाही उचित रे।।५०।।

५१. त्यागिली आसक्ती ज्याने
जिंकिला कर्तेपणा।
पाविले नैष्कर्म नर तो
थोर संन्यस्त, अर्जुना।।५१।।

५२. होऊनि परिपूर्ण कर्मी,
सिद्धि पावे ज्ञानिया
ज्ञान हे अत्युच्च पार्था
सांगतो मी निश्चचा।।५२।।

५३. शुद्धबुद्धि धैर्य सात्विक
शमदमादि साधने
देहभावा करी नियंत्रित
विषय विन्मुख वर्तने।।५३।।

५४. रागद्वेषा पार केले
चित्तमनसा स्थैर्यता।
सेवूनि एकान्त ध्याने
धरिली वैराग्यता।।५४।।

५५. सेवितो मित अन्न सात्विक
त्यागिला कर्तेपणा
दर्प-बलता-काम तैसा
क्रोध त्यजला अर्जुना।।५५।।

५६. शांतिधारण सर्वकाली
थोर ऐसा ज्ञानिया
होतसे परब्रम्ह नर तो
प्रिय मजला निश्चया।।५६।।

५७. पार केले द्वंद्वभावा
शोक आशा लांघितो।
भूतमात्री जो समत्वी
प्रिय मजला भक्त तो।।५७।।

५८. भक्तीमार्गे जाणितो मज
भक्त मजला तत्वता।
होई तो मद्रुप ऐसे
समज निश्चित भारता।।५८।।

५९. सतत करीतो विहित कर्मे
येऊनि मम आश्रया
पावे शाश्वत धाम अक्षय
ममं प्रसादे ज्ञानिया।।५९।।

६०. कर्म करिसी मज समर्पित
बुद्धियोगा आश्रीते
जाणूनी मम साध्य उत्तम
चित्त ठेवी मजप्रते।।६०।।

६१. मद्प्रसादे पार करिसी
विघ्न खडतर भारता
त्यागिसी जर वचन माझे
नष्ट होशील निश्चिता।।६१।।

६२. "नाही मी लढणार" ऐसा
व्यर्थ निश्चय जाण रे।
नेइ तुजला प्रकृति तवॉ
बळकरी युद्धास रे।।६२।।

६३. प्रकृतिद्भव कर्म त्यांते
बद्ध होऊनि अर्जुना।
मोहभावे म्हणसी "ना" तरी
युद्ध अटळ कुरूनंदना।।६३।।

६४. जाहला हृदयस्थ ईश्वर
भूतमात्री सकलता।
त्याचिया मायाप्रभावे
विचलनी चरअचरता।।६४।।

६५. श्रेष्ठ ऐशा परमधामा
शरण जा हे अर्जुना।
परमशांती सौख्य अक्षय
पावी पांडुनंदना।।६५।।

६६. प्रितीपूर्वक ज्ञान उत्तम
कथिले तुजप्रत मी स्वये।
करूनि त्यावर बुद्धिं विनिमय,
कर्म करिसी निश्चये।।६६।।

६७. श्रेष्ठ उत्तम वचन माझे
ऐक कुंतीनंदना
इष्ट करण्या हेतूअर्थे
कथितो तुजप्रत अर्जुना।।६७।।

६८. चित्तमानस करी मदर्पणं
कर्म-भक्ती मजप्रती।
सत्य वदतो, भक्त माझा
होई मद्रुप निश्चिती।।६८।।

६९. त्यागुनि तू सर्वधर्मा,
शरण ये मम अश्रया।
नष्ट करीन तव पाप-किल्मिष
शोक त्यागिसी निश्चिया।।६९।।

७०. वचन माझे तोर ऐसे
सांगिशी नच नास्तिका।
नाही श्रद्धा-नाही शुचिता
मजप्रती जे निंदका।।७०।।

७१. थोर पावन ज्ञान उत्तम
कथन केले मी स्वये।
माझियां भक्तास दे
ह्या अमृता जो निश्चये।।७१।।

७२. येई मजप्रत भक्त ऐसा
ऐक हे कुंतीसुता।
ना कुणी मज प्रिय त्याहून
भुवन लोकी भारता।।७२।।

७३. आपुला संवाद पार्था
ज्या कुणी अभ्यासिला।
ज्ञानयज्ञे त्या नराने
परमब्रम्हा पूजिला।।७३।।

७४. भक्तीभावे पूर्ण निष्ठे
श्रवतसे संवाद जो
मुक्त होऊन पाप-दोषे
पुण्यस्थानी पावी तो।।७४।।

७५. महाबाहो, सांग मजला
काय तव आता स्थिती।
नष्टला का मोह आणिक
स्थिर झाली का मती?।।७५।।

<u>अर्जुन म्हणाला :</u>

७६. नष्ट झाला मोह सारा
स्थैर्य आले मन्मती।
स्मरले मम कर्तव्य कृष्णा,
तवप्रसादे, श्रीपती।।७६।।

संजय म्हणाला :

७७. ऐकुनि संवाद अद्‌भुत
रोमहर्षित जाहलो
व्यासऋषी पावन प्रसादे
आज भरूनि पावलो।।७७।।

७८. ऐकिले मी योगशास्त्रा
वासुदेवाच्या मुखे
स्मरूनि त्याच्या विश्वरूपा
उमळतो मी चित्सुखे।।६८।।

७९. योगईश्वर कृष्ण जेथे
पार्थ कुशल रणपती।
तेथ नांदे धैर्य-निती-विजय-लक्ष्मी, सन्मती।।७९।।

**"व्यासरचित एक शतसहस्त्र श्लोक असलेल्या महाभारतामधे, भीष्मपर्वातील श्री भगवद्‌गीता उपनिषदातील - ज्यात ब्रम्हविद्येचे योगशास्त्र आणि श्रीकृष्णार्जुनांच्या संवाद आहे, मोक्षसंन्यासयोग नामक अठरावा अध्याय समाप्त झाला।।**

**।।श्री कृष्णार्पणमस्तु।।**

# श्री कृष्णार्जुनसंवादाची परिणिती

सज्ज झाला पार्थ शार्दुल
क्षात्रधर्मा पालना।
सैन्य समुचित हो प्रफुल्लित
थोर करिती गर्जना।।१।।

ज्ञान-निती करी नियंत्रित
कर्म-उद्यम-कुशलता।
नित्य होई प्रकट तेथे
कृष्ण-अर्जुन एकता।।२।।